गुरुवार, २३ फेब्रुवारी २०२३

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक २१६
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अवघ्या १०० रुपयांत मिळणार आनंदाचा शिधा




**मुंबई :** गुढीपाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त १०० रुपयांत आनंदाचा शिधा वाटण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. एक कोटी ६३ लाख शिधा पत्रिकाधारकांना याचा लाभ मिळणार आहे. अंत्योदय अन्न योजना, प्राधान्य कुटुंब तसेच औरंगाबाद आणि अमरावती विभागातील सर्व आणि नागपूर विभागातील वर्धा अशा १४ शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधा पत्रिकाधारकांना एक किलो रवा, एक किलो चणाडाळ, एक किलो साखर आणि एक लिटर पामतेल असा आनंदाचा शिधा गुढीपाडव्यापासून पुढील एक महिन्याच्या कालावधीसाठी ई-पॉसद्वारे १०० रुपये प्रतिसंच असा सवलतीच्या दरात दिला जाईल. ई-पासची व्यवस्था नसलेल्या ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने हा शिधा दिला जाईल.

### अंतरंग

शेत तेथे मत्स्यतळे योजना राबविणार -मुनगंटीवार/२

नवी मुंबईत श्वसनाच्या विकारांमध्ये वाढ/६

रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थिनीचे स्केटिंगमध्ये यश/८

### शिवसेना पक्ष नाव व चिन्हाबाबत पुन्हा दोन आठवड्यांनी सुनावणी

# निवडणूक आयोगाचा निर्णय कायम

## सुप्रीम कोर्टाचा ठाकरे गटाला धक्का

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**निवडणूक आयोगाने शिवसेना हे पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह शिंदे गटाला दिल्याच्या निर्णयाला ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात आव्हान दिले आहे. त्यावर बुधवारी (दि. २२) सुनावणी झाली. या वेळी ठाकरे गटाने निवडणूक आयोगाच्या निर्णयावर स्थगिती देण्याची मागणी केली, मात्र सुप्रीम कोर्टाने निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला आहे. त्याचप्रमाणे दोन आठवड्यानंतर या याचिकेवर पुन्हा सुनावणी होणार आहे.**



निवडणूक आयोगाने शुक्रवारी शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर लगेच ठाकरे गटाने सुप्रीम कोर्टात धाव घेण्यात आली. निवडणूक आयोगाच्या निर्णायावर ठाकरे गटाने आक्षेप घेतला. सुरुवातीला सुप्रीम कोर्टाने यावर तातडीची सुनावणी घेण्यास नकार दिला होता. त्यानंतर बुधवारी यावर सुनावणी झाली. यामध्ये दोन्ही गटांकडून जोरदार युक्तीवाद झाला.

दोन आठवडे ठाकरेंच्या आमदारांवर कारवाई करता येणार नाही, मात्र आयोगाच्या निर्णायाला स्थगिती देण्यास सुप्रीम कोर्टाने नकार दिला आहे. तोपर्यंत 'मशाल' हे चिन्ह ठाकरे गटाला कायम ठेवण्यात येणार आहे, असे कोर्टाने सांगितले आहे.

या वेळी ठाकरे गटाच्या आमदारांविरोधात व्हिप काढणार नाही, अपात्र करणार नाही, असे आश्वासन शिंदे गटाने सुप्रीम कोर्टात दिले आहे. शिंदे गटाचे वकील निरज कौल यांनी याबाबत कोर्टात आश्वासन दिले आहे.

> **सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाच्या निर्णयाला कुठेही स्थगिती दिली नाही. कपिल सिब्बल यांनी व्हिप लावून आमदारांना अपात्र केले जाऊ शकते, अशी शक्यता व्यक्त केली, तसेच संपत्ती व बँक खात्यातील निधीचा प्रश्न उपस्थित केला. त्यानंतरही सुप्रीम कोर्टाने आयोगाच्या निर्णयाला स्थगिती देण्यास नकार दिला. न्यायालयाने आम्हाला आमची बाजू मांडण्यासाठी दोन आठवड्यांची मुदत दिली आहे.**
> **–राहुल शेवाळे**, खासदार, शिवसेना

(छाया : योगेश पाटील)



## वनवासी बांधवांना होणार मथुरा-अयोध्या-काशी दर्शन

### आमदार महेश बालदी यांचा पुढाकार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या मतदार संघातील वनवासी बांधवांना हिंदू तीर्थस्थळांचे दर्शन व्हावे, या उदात्त हेतूने उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी १२५० वनवासी बांधवांना २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत मथुरा-अयोध्या-काशी या तीर्थस्थळांची यात्रा आयोजित केली आहे. या यात्रेला पनवेल रेल्वेस्थानकात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार देवेंद्र साटम यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ झाला.

**लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रयाण**

या स्तुत्य उपक्रमाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी आमदार महेश बालदी यांचे कौतुक करीत त्यांना तसेच यात्रेकरूंना सुखकर प्रवासाच्या शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, पनवेल शहराध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, सीतााताई पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, डॉ. अरुणकुमार भगत, प्रकाश बिनेदार, अजय बहिरा, मुकीद काझी, माजी नगरसेविका वृषाली वाघमारे, कामोठे संपर्कप्रमुख विनोद साबळे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, माजी सरपंच सुभाष म्हात्रे, भाताणचे सरपंच तानाजी पाटील, कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर, रेल्वे पोलीस निरीक्षक सीताराम राणा, करंजाडेचे सरपंच मंगेश शेलार, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, मंगेश वाकडीकर, धीरज ओवळेकर, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, कराडेचे माजी सरपंच विजय मुरकुटे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

उरण विधानसभा मतदारसंघात मोठ्या संख्येने वनवासी बांधव राहतात. ते रोजंदारी करीत आपला उदरनिर्वाह करीत असतात, त्यामुळे आर्थिक परिस्थिती पाहता त्यांना तीर्थस्थळ किंवा सहलीला जाणेही कठीण असते. **(पान २ वर..)**

## लोकनेते रामशेठ ठाकूर 'रयत'च्या पाठिशी खंबीर

### अध्यक्ष खासदार शरद पवार यांचे गौरवोद्गार

**अहमदनगर : प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेच्या कोणत्याही शाखेला कोणतीही अडचण आली की, आमच्या मागे हक्काने 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हक्काने उभे राहतात, असे गौरवोद्गार 'रयत'चे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी कर्जत येथे काढले.

अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथील रयत शिक्षण संस्थेच्या दादा पाटील महाविद्यालयात शारदाबाई पवार सभागृहाचा उद्घाटन सोहळा मंगळवारी (दि. २१) आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी ते बोलत होते. **(पान २ वर..)**

(छाया : अक्षय शार्दूल)



## राज्यात चार रो-रो प्रकल्पांना गती

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्रीय जहाज व परिवहन मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. या वेळी महाराष्ट्रात पुढील दीड वर्षांत रो-रो सेवेचे मुंबई ते मोरा, मुंबई ते काशीद, मुंबई ते दिघी, मुंबई ते रेवस करंजा हे प्रकल्प सुरू करण्याबाबत चर्चा करण्यात आली.

रो-रो सेवेसाठी बंकर फ्यूलचा वॅट कमी करण्यात यावा, जुन्या प्रवासी बोटींचे अद्ययावतीकरण करावे, पर्यावरणपूरक बोटींची समावेश याविषयीही चर्चा झाली.

### माणगावातील वृद्ध महिलेचे हत्या प्रकरण

## तीन संशयित पोलिसांच्या ताब्यात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावातील म्हसेवाडी येथील एका वृद्ध महिलेला लुटून तिची हत्या केल्याची घटना मंगळवारी (दि. २१) म्हसेवाडी गावच्या हद्दीत घडली. या प्रकरणी तीन संशयितांना माणगाव पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांची चौकशी करण्यात येत आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.



फिर्यादी विनोद श्रीरंग सावंत यांची आई संगीता श्रीरंग सावंत (वय ६९) या घरात एकट्याच असताना आरोपीने चोरीच्या उद्देशाने प्रवेश केला. फिर्यादींची आई मोरीमध्ये काम करीत असताना आरोपीने त्यांना पाण्याने भरलेल्या टबमध्ये बुडवून जीवे ठार केले. नंतर गळ्यातील सोन्याची माळ, हातातील सोन्याच्या चार बांगड्या, ६० हजार रुपये किमतीच्या कानातील सोन्याच्या कुडी, त्याला साखळी जोडलेली अंदाजे दीड तोळे वजनाची असा एकूण तीन लाखांचा ऐवज लुटला आहे. या घटनेची माहिती समजताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली.

याप्रकरणी फिर्यादी विनोद श्रीरंग सावंत यांच्या तक्रारीवरून माणगाव पोलिसांनी तीन संशयितांना ताब्यात घेतले आहे. माणगाव पोलीस ठाण्यात भादंवि संहिता कलम ३०२, ३९४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. प्रकरणाचा अधिक तपास सपोनि. मोहिते हे करीत आहेत.

## पनवेलमध्ये रविवारी 'मायबोली साजिरी'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी आणि मराठी राजभाषा दिन याच्या औचित्याने भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हातर्फे आयोजित व स्वररंग, डोंबिवली प्रस्तुत 'मायबोली साजिरी मराठी मनाचा कॅनव्हास' या संस्कृती वृद्धिंगत करणाऱ्या कार्यक्रमाचे रविवारी (दि. २६) सायंकाळी ५.३० वाजता शहरातील गोखले सभागृहात आयोजन करण्यात आले आहे.

या सांस्कृतिक कार्यक्रमात अभंग, ओव्या, कविता, म्हणी, उखाणे, गाणी, संत साहित्य, खाद्य संस्कृती, पेहेराव संस्कृती, शस्त्रास्त्र संस्कृती या सर्वांचा अभिवाचनात्मक आविष्कार असून या कार्यक्रमात लेखक, दिग्दर्शक, संकल्पना, निर्मिती मेघा विश्वास, कलाकार समीर सुमन, तपस्या नेवे, अमेय रानडे, मेघा विश्वास तर साईड रिदम रुपेश गांधी यांचा सहभाग आहे. आजच्या मॉडर्न पिढीसाठी आणि त्यांच्यावर माय मराठी अर्थात माझ्या मराठीचे संस्कार करणाऱ्या आधीच्या पिढीसाठीही हा कार्यक्रम पर्वणी आहे. त्या अनुषंगाने या कार्यक्रमाच्या मोफत प्रवेशिकेसाठी (९०२९५८०३४३) किंवा (९८७०११६९६४) या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




# महसूल विभाग अधिक सक्षम करणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे प्रतिपाद ■ लोणी येथे महसूल परिषदेचे उद्घाटन

**शिर्डी : प्रतिनिधी**

महसूल विभाग कालानुरूप आपल्या यंत्रणेत बदल करून अत्याधुनिक साधनांचा वापर करत आहे. येत्या काळात महसूल विभागाच्या बळकटीकरणासाठी सकारात्मक निर्णय घेऊन हा विभाग अधिक लोकाभिमुख करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज लोणी येथे केले. जनतेची कामे अधिक पारदर्शक व गतिमान होण्यासाठी अधिकाऱ्यांनी जनतेशी थेट संवाद साधावा, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली.

राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वतीने लोणी येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय महसूल परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

त्या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, खासदार सदाशिव लोखंडे, खासदार डॉ. सुजय विखे पाटील, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील उपस्थित होते.



मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मागील सहा महिन्यांत जनतेच्या कल्याणासाठी घेतलेल्या निर्णयात महसूल विभागाचे सर्वाधिक निर्णय आहेत. शासनाचे निर्णय राज्याच्या शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्याचे काम या विभागामार्फत केले जाते.

राज्याच्या उत्पन्नाच्या २५ टक्के महसूल हा या विभागाचा असतो. महाराजस्व मोहीम, ई-प्रॉपर्टी कार्ड, चार लाख फेरफार नोंदी ऑनलाईन करणे, ड्रोनद्वारे जमिनीची मोजणी, जिल्ह्याचे नकाशे डिजिटल करणे असे सर्वसामान्यांच्या हिताचे अत्याधुनिक प्रकल्प महसूल विभाग राबवित आहे.

गावठाण जमाबंदी प्रकल्प देशात प्रथम महाराष्ट्रात राबविला जात आहे. देशात महाराष्ट्राचा महसूल विभाग प्रथम क्रमांकावर आहे. राज्याच्या वाळू धोरणात अधिक सुटसुटीतपणा आणण्याची आवश्यकता आहे. गाळमुक्त धरण, गाळमुक्त नदी ही संकल्पना राबविण्याची गरज आहे. यावर या महसूल परिषदेत निश्चितच चर्चा होईल, अशी अपेक्षा मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केली.

### निळवंडे प्रकल्पास मान्यता

अहमदनगर जिल्ह्याच्या दृष्टीने अत्यंत जिव्हाळ्याचा असलेल्या निळवंडे प्रकल्पाचे काम संथगतीने सुरू होते. सर्वसामान्य व शेतकऱ्यांच्या दृष्टीने या प्रकल्पाचे महत्व लक्षात घेता तसेच महसूलमंत्री विखे पाटील यांनी सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे या प्रकल्पास पाच हजार, १७७ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील ६८ हजार, ८७८ हेक्टर जमीन ओलिताखाली येणार आहे. शासनाने आतापर्यंत अशाप्रकारच्या २२ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली आहे. यामुळे राज्यातील साडेपाच लाख हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार असल्याचेही मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी सांगितले.

### एका क्लिकवर सुविधा देणार : महसूलमंत्री

महसूलमंत्री विखे पाटील म्हणाले, महसूल विभाग लोकाभिमुख काम करत आहे. सलोखा योजना, महाराजस्व अभियान, डिजिटल मॅपींग, ई-प्रॉपर्टी कॉर्ड हे प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या विभागाकडून ५५ हजार कोटींचा महसूल राज्याला मिळतो. येत्या काळात आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने सर्वसामान्यांना एका क्लिकवर अनेक सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात येईल. महसूल विभागाच्यावतीने राज्यातील जनतेसाठी हितकारक ठरावेत, असे धोरणात्मक निर्णय घेण्याच्या दृष्टीनेही महसूल परिषद लोणी येथे आयोजिल्याचे सांगितले.

# राज्यात शेत तेथे मत्स्यतळे योजना राबविणार -मंत्री सुधीर मुनगंटीवार



**मुंबई : प्रतिनिधी**

प्रत्येक शेतकऱ्याला आपल्या शेततळ्यात सहजतेने मत्स्यपालन करता यावे यासाठी शेत तेथे मत्स्यतळे योजना राबविण्यात येणार असल्याची घोषणा नुकतीच मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ससून डॉक येथे सागर परिक्रमा कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना केली.

केंद्रीय मत्स्यपालन मंत्री परषोत्तम रुपाला यांच्या सागर परिक्रमेच्या तिसऱ्या टप्प्याच्या सांगता सभेत त्यांनी या योजनेचे सूतोवाच केले. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देतांना त्यांनी या योजनेची संकल्पना मांडली. सुधीर मुनगंटीवार यावेळी म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सागरी मासेमारीसोबतच गोड्या पाण्यातील मत्स्यपालनावर भर देण्याचे ठरवले असून त्याकरता विविध योजना सुरू केल्या आहेत. गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाकरता केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. त्याच धर्तीवर राज्यानेही गोड्या पाण्यातील मत्स्यपालनावर भर देण्याचे ठरवले आहे.

मुनगंटीवार म्हणाले की, आजवर सागरी मासेमारीवरच भर देण्यात आला होता. मात्र गोड्या पाण्यातील मत्स्यपालनाच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीची क्षमता असून हा व्यवसाय निर्यातक्षम आहे. प्रधानमंत्र्यांच्या आत्मनिर्भर भारत संकल्पनेत मत्स्यपालन क्षेत्राचे योगदान मोठे असणार आहे. आजवर शेततळ्यात व्यावसायिक मत्स्यपालन करण्यासाठी विविध परवानग्या घेणे आवश्यक होते, मात्र यापुढे त्यात बदल करीत शेतकऱ्याला स्वतःच्या शेततळ्यात मत्स्यपालन करण्यासाठी परवानगीची आवश्यकता लागू नये, असा शासनाचा मानस असल्याची माहितीही मुनगंटीवार यांनी या वेळी दिली.

### समुद्रात पिंजऱ्यातील मत्स्यपालनास प्रोत्साहन

आजवर सागरात केवळ मासेमारी चालत आली आहे. सागरी मत्स्य संवर्धन किंवा सागरी मत्स्यपालन या विषयांवर फार भर दिला गेला नव्हता. पारंपरिक मत्स्यव्यवसायात केवळ सागरी मासेमारीवर भर दिला जातो. धरण, तळे, तलाव अशा गोड्या पाण्याच्या जलाशयात मात्र मत्स्यबीज संवर्धन, पिंजऱ्यातील मत्स्यपालन अशाप्रकारे मत्स्यपालन केले जाते, मात्र आता समुद्रातही पिंजरा पद्धतीने मत्स्यपालनास प्रोत्साहन देण्याचे राज्य शासनाने ठरवले असून लवकरच याविषयातील विस्तृत धोरण जाहीर करण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री मुनगंटीवार यांनी दिली.

# ...तर जनआंदोलन अधिक गतीने करणार : दशरथ भगत



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या अनागोंदी व बेफिकीरी कार्यपद्धतीमुळे शहरातील अनेक उद्याने, ट्री बेल्ट्स, रस्ते दुभाजक, शहर सुशोभिकरणा अंतर्गत हिरवळीच्या जागा,ओपन जिमचे साहित्य, मैदाने व उद्यानांशी संबंधित अभियांत्रिकी कामे रखडली आहेत. त्यामुळे उद्यानांची अवस्था बिकट झाली असून करोडो रूपये खर्च वाया जात आहे. याविषयी माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत, माजी नगरसेवक वैजयंती भगत यांनी आयुक्तांसमवेत बैठक घेतली. शहरातील सदर वास्तू भकास व ओसाड केकेल्या आहेत. भगत यांनी आयुक्तांना अनेक मुद्दे फोटोंसह लक्षात आणून दिले.

मात्र प्रशासन याची दखल घेत नसल्याने व शहरातील आणि प्रामुख्याने भगत यांच्या वाशी व सानपाडा या तिन्ही प्रभागातील नवी मुंबईतील ही नागरिकांमध्ये महापालिकेच्या प्रति रोष व्यक्त होत असल्याने दशरथ भगत यांनी नागरिकांसह महापालिकेच्या मुख्यालयाबाहेर प्रथमतः ७ फेब्रुवारी व तदनंतर प्रशासनाच्या विनंती पत्रानंतर २१ फेब्रुवारी रोजी जनआंदोलन घेण्याची भूमिका घेतली आहे.तसे पत्र महापालिका आयुक्त व पोलीस प्रशासनास देण्यात आले. या बैठकीत अनेक मुद्यांना हात घालण्यात आला. या वेळी उद्यान व मैदाने, ओपन जिम, रस्ते दुभाजक, ट्री बेल्ट्स, जॉगिंग ट्रॅक्सबाबत समस्या निवारणासाठी अनेक सोसायट्यांची पत्रे आयुक्तांना सादर करण्यात आली.

# छावा प्रतिष्ठानची कार्यकारिणी जाहीर

**माणगाव : प्रतिनिधी**

छावा प्रतिष्ठान या लोकाभिमुख व सेवाभावी प्रतिष्ठानच्या सभेत प्रतिष्ठानची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. प्रतिष्ठानच्या कार्याध्यक्षपदी माणगावमधील सामाजिक कार्यकर्ते सुमित काळे यांची कार्याध्यक्षपदी निवड झाली असल्याचे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष निलेश थोरे यांनी जाहीर केले, तर उपाध्यक्षपदी माणगावचे उद्योजक सागर गांधी व सेवाभावी कार्यकर्ते सौरभ खैरे यांची निवड करण्यात आली.

सचिवपदी माजी उपसरपंच स्वप्नील सकपाळ, सहसचिवपदी वृषभ मोकल, खजिनदार पदी समीर सकपाळ, सहखजिनदार पदी प्रदीप लांगे, युवक कल्याण समिती पदी मंदार मढवी, कार्यकारिणी समिती अध्यक्ष पदी शशिकांत जठार, उपाध्यक्ष आकाश मढवी, ओमकार गायकवाड, महेश खांडेकर, अमोल पवार, शरद शिगवण, किरण कांबळे, प्रणय माने, अभिजित मोने यांची निवड करण्यात आली.

# भाजप द्रोणागिरी शहरातर्फे शिवजयंती उत्सव साजरा

**उरण : प्रतिनिधी**

भाजप द्रोणागिरी शहर अध्यक्ष विधीत चंद्रहास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजप द्रोणागिरी शहराच्यावतीने शिवजयंती साजरी करण्यात आली त्या निमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शिवप्रतिमा पूजा व आरती, महाप्रसाद, जनाई प्रोडक्शन निर्मित यशोगाथा शिवरायांच्या पराक्रमाची व संसृतिक कार्यक्रम संकल्पना व निर्माता रमणिक म्हात्रे यांची होती.




या वेळी आमदार महेश बालदी भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, उरण शहर अध्यक्ष कौशिक शाह , जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर, भाजपा रायगड जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत घरत, भाजप रायगड जिल्हा वाहतूक संघटना अध्यक्ष सुधीर घरत, भाजप रायगड जिल्हा कामगार संघटना अध्यक्ष जितेंद्र घरत, भाजप उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, भाजप चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, नगरसेवक राजेश ठाकूर, द्रोणागिरी कार्यध्यक्ष पंडितशेठ घरत, भाजप जेष्ठ नेते प्रशांत पांडुरंग पाटील, भाजप जेष्ठ नेते चंद्रहास पाटील, डोंगरी ग्रामपंचायत सदस्या प्रियदर्शनी घरत, माजी उपसरपंच डोंगरी दर्शन घरत, हितेश शाह, उद्योजक मोटा सिंग दसांना, उद्योजक देवीसिंग चडाना, उद्योजक विपुल पटेल, युवा कार्यकर्ता राजविलास पाटील, युवा कार्यकर्ता विघ्नेश पाटील, युवा कार्यकर्ता प्रशांत दिलीप पाटील, युवा कार्यकर्ता किरण घरत, बालाजी सालवे, रुस्तम घरजाले, परसराम टाचतोडे, प्रकाश तुरेवाले, जयेश घरत, अर्जुन जोगदन, यश पोटफोडे, कनैया सेवक, किसन दसाना, सैदुल अहमद, मनोज गौड व द्रोणागिरी नोडचे सर्व भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नियुक्ती



**पनवेल : सामाजिक, राजकीय, कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक नितीन पाटील यांची उत्तर रायगड जिल्हा भाजपच्या सरचिटणीसपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल शिवसेना पनवेल महानगरप्रमुख व माजी नगरसेवक प्रथमेश सोमण यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. या वेळी शिवसेना पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, शहर संघटक अभिजित साखरे, उपशहर प्रमुख मच्छिंद्र झगडे, शाखाप्रमुख रमेश बेद, अभिनय सोमण व भरत जाधव आदी उपस्थित होते.**

# नदी साक्षरतेविषयी १९ मार्चला मुंबईत हेमामालिनीचे नृत्यनाट्य

**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या एक भारत श्रेष्ठ भारत या संकल्पनेअंतर्गत ज्येष्ठ अभिनेत्री, नृत्यांगना तथा खासदार हेमा मालिनी पावन गंगानदीविषयी नृत्यनाट्याचे भव्य सादरीकरण मुंबईत करणार आहेत. सांस्कृतिक विभागाच्या संयुक्त विद्यमाने मुंबईतील एनसीपीए नाट्यगृहात १९ मार्च रोजी या भव्य नृत्यनाट्याचे आयोजन करण्यात आले आहे.

खासदार हेमा मालिनी यांनी नुकतीच सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांची सदिच्छा भेट घेतली, तेव्हा या कार्यक्रमाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

एक भारत श्रेष्ठ भारत या संकल्पनेअंतर्गत देशभरात सर्वत्र विविध कार्यक्रमांतून भारतीय संस्कृतीचे पैलू उजळले जातील.

# ठाकरे गटाच्या १० कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल

**खोपोली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत बेताल वक्तव्य करणाऱ्या ठाकरे गटाच्या दहा पदाधिकाऱ्यांवर खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे.




धनुष्यबाण चिन्ह हे शिंदे गटाला निवडणूक आयोगाने दिल्यानंतर २० फेब्रुवारी रोजी शिळफाटा येथे ठाकरे गटाच्या वतीने निवडणूक आयोगाचा निषेध करण्यात आला. या वेळी काही पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्याबाबत बेताल वक्तव्य केले. यासंदर्भातली तक्रार मंगळवारी शिंदे गटाच्या वतीने तालुकाप्रमुख संदेश पाटील व पदाधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात दिली होती. कारवाईबाबत ४८ तासांचा अल्टीमेटम दिला होता. या पार्श्वभूमीवर खोपोली पोलीस सतर्क झाले. उशिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक कदम पुढील तपास करीत आहेत. हा गुन्हा दाखल झाल्यामुळे शिंदे गटविरुद्ध ठाकरे गट हा कलगीतुरा रंगणार असल्याचे दिसत आहे.

## दुखवटा

### कुंदा नाईक



**मुंबई :** उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल आणि माजी केंद्रीय मंत्री राम नाईक यांच्या पत्नी कुंदा नाईक (वय ८४) यांचे मंगळवारी (दि. २१) प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी उशिरा गोरेगाव पूर्व येथील शिवधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. कुंदा नाईक यांच्या पश्चात पती, मुलगी विशाखा, निशिगंधा आणि नातू ॲड. शार्दूल असा परिवार आहे.

### जानू आखाडे



**नागोठणे :** लोणेरे जवळील पन्हळघर झोरेवाडीतील निवृत्त सीआरपीएफ जवान जानु आखाडे यांचे रविवारी उपचारादरम्यान अल्पशा आजाराने निधन झाले. तेव्हा ते ७८वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन सुना, दोन मुली, दोन जावई व एकूण आठ नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशविधी कार्यक्रम मंगळवारी २८ फेब्रुवारी रोजी तर उत्तरकार्य गुरुवार २ मार्च रोजी पन्हळघर झोरेवाडी येथील राहत्या घरी आयोजित केले आहे.

### चंद्रकांत मोरे



**धाटाव :** रोहा तालुक्यातील धाटाव येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत शिवराम मोरे यांचे मंगळवारी आकस्मात निधन झाले. मृत्यूसमयी ते सुमारे ६७ वर्षांचे होते. पत्रकार शशिकांत मोरे आणि सामाजिक कार्यकर्ते सूर्यकांत मोरे यांचे ते वडील होते. स्व. चंद्रकांत मोरे यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी, मुले, सुना नातवंडे तसेच भाऊ, बहिण असा मोठा परिवार आहे. त्यांची दशक्रियाविधी गुरूवार २ मार्च रोजी धाटाव तलाव येथे तर तेरावे उत्तरकार्य रविवार ५ मार्च रोजी त्यांच्या निवासस्थानी होणार आहेत.

पान १ वरुन

# वनवासी बांधवांना मथुरा-अयोध्या-काशीचे दर्शन

त्या अनुषंगाने त्यांच्याकडे अनेक राजकीय पक्षांनी कधीच लक्ष दिले नाही, मात्र आमदार महेश बालदी यांनी विजय संपादन केल्यावर आदिवासी समाजाच्या अनेक समस्यांना दूर करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. आदिवासी वाड्या व पाड्यांवर मोठ्या प्रमाणात विकास कामे झाल्याने उरण मतदारसंघातील वनवासी बांधवांचा आमदार महेश बालदी यांना मोठा पाठिंबा मिळत आहे. आपल्या मतदारसंघातील या बांधवांना हिंदू तीर्थस्थळ दर्शन व्हावे, म्हणून आमदार महेश बालदी यांनी मतदारसंघातील वनवासी बांधवांसाठी मथुरा-अयोध्या- काशी या तीर्थयात्रेचे आयोजन केले आहे. विशेष म्हणजे यात्रेसाठी सर्वांना संधी देण्यात आली आहे.

या यात्रेकरूंची व्यवस्था बघण्यासाठी १०० स्वयंसेवक आहेत. ही यात्रा पूर्णतः मोफत असून यात्रेच्या कालखंडात चहा, नाष्टा, जेवण, तसेच राहण्याची उत्तम सोय करण्यात आली आहे. त्यामुळे आमदार महेश बालदी यांच्या या अनोख्या उपक्रमामुळे वनवासी समाजातून आनंदाची भावना व्यक्त होत आहे.

वनवासी बांधवांना तीर्थस्थळाचे दर्शन व्हावे या प्रामाणिक भावनेने आमदार महेश बालदी यांनी हा उपक्रम राबविला आणि विशेष म्हणजे आमदार महेश बालदी स्वतः या यात्रेकरूंसोबत यात्रेत सहभागी झाले आहेत.

# लोकनेते रामशेठ ठाकूर 'रयत'च्या पाठिशी खंबीर

या सभागृहाचे उद्घाटन 'रयत'चे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयातील संगणक प्रयोगशाळेचे उद्घाटन मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले.

खासदार शरद पवार यांनी, जामखेड कर्जत तालुक्यातील 'रयत'साठी देणगी दिलेल्या सर्वांचे अभिनंदन केले. दुष्काळग्रस्त असणारा कर्जत तालुका आज विकसित होत आहे. आज या परिसरामध्ये विविध शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांसाठी दर्जेदार सभागृह गरजेचे होते ते आज पूर्णत्वास आले असल्याचे सांगितले, तसेच रयत शिक्षण संस्थेचे हे भाग्य आहे संस्थेच्या कोणत्याही शाखेमध्ये कोणतीही समस्या उद्भवली किंवा कोणताही नवीन उपक्रम घेतला की, कशाचीही अपेक्षा न ठेवता लोकनेते रामशेठ ठाकूर स्वतः पुढाकार घेतात, असे प्रतिपादन केले.

या सोहळ्यावेळी रयत गीतासोबत दादा पाटील महाविद्यालय : एक दृष्टीक्षेप ही चित्रफीत दाखविण्यात आली. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी या वेळी शारदाबाई पवार सभागृह हे संस्थेच्या इतिहासात पहिल्यांदाच उभारल्याबद्दल राजेंद्र तात्या फाळके व आमदार रोहित पवार यांचे अभिनंदन केले आणि रयत शिक्षण संस्थेचे हे पहिले आणि सर्वोत्कृष्ट सभागृह असल्याचे सांगितले.

या समारंभाला संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे, संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू पाटील, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, मीनाताई जगधने, बाबासाहेब भोस, बाळासाहेब बोठे, ॲड. रवींद्र पवार, एम. सी. शेख, संस्थेचे उत्तर विभागीय अध्यक्ष आमदार आशुतोष काळे, सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य राजेंद्र तात्या फाळके, जनरल बॉडी सदस्य आमदार रोहित पवार, अंबादास पिसाळ, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य बप्पाजी धांडे, राजेंद्र निंबाळकर, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय नगरकर, बांधकाम समिती चेअरमन डॉ. संतोष लगड, उत्तर विभागाचे इन्स्पेक्टर तुकाराम कन्हेरकर, कर्जतच्या नगराध्यक्षा उषा राऊत, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष सुभाषचंद्र तनपुरे, दादा पाटील, निर्मला पाटील, सुनंदाताई पवार, शंकर देशमुख, बाजीराव कोरडे, अशोक बाबर, किरण पाटील, अंबादास गारुडकर, माजी सचिव शिवाजीराव भोर, ज्ञानदेव पांडुळे, पोकळे, प्राचार्य डॉ. ज्ञानदेव मस्के, प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड, प्राचार्य डॉ. बाळ कांबळे, प्राचार्य डॉ. थोपटे, प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांच्यासह विविध शाखांचे पदाधिकारी, मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये बालकांच्या आरोग्याला प्राधान्य





## महापालिकेतर्फे जागरूक पालक सुदृढ बालक अभियान

**पनवेल : प्रतिनिधी**

शासनाच्यावतीने ९ फेब्रुवारीपासून जागरूक पालक, सुदृढ बालक अभियान राज्यात सुरू करण्यात आले आहे. पनवेल महापालिकेने या अभियानांतर्गत २५ हजार ७७० बालकांची आरोग्य तपासणी केली. यामुळे बालकांमधील आजारांचे वेळीच निदान होऊन त्यांच्यावर उपचार करण्यास मदत होत आहे.

बालकांचे आरोग्य सदृढ रहावे यासाठी शासनाच्या वतीने 'जागरूक पालक, सुदृढ बालक' अभियान सुरू करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली या अभियानांतर्गत पनवेल महापालिकेने आतापर्यंत २५ हजार ७७० बालकांची आरोग्य तपासणी केली आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा आरोग्य प्रशासनाच्या वतीने जागृत पालक सुदृढ बालक अभियान राबविण्यात येत आहे. दोन महिने राबविण्यात येणाऱ्या या अभियानासाठी पालिकेच्या वतीने २० आरोग्य पथके तयार करण्यात आलीले आहेत. त्यामध्ये महापालिकेच्या परिचारिका, एमजीएम महाविद्यालयाकडून डॉक्टर्स, नर्सेस तसेच राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम अंतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्याची दोन पथके, सामुदायिक आरोग्य अधिकारी यांच्या मार्फत महापालिका क्षेत्रातील बालकांची तपासणी करण्यात येत असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली

जिल्ह्यातील शून्य ते सहा वर्ष वयोगटातील अंगणवाडी, बालवाडी व खासगी नर्सरीतील बालके, ६ ते १८ वर्ष वयोगटातील शासकीय, खाजगी शाळा, अनुदानित शाळा दिव्यांग शाळा व आश्रमशाळेतील, महाविद्यालयातील विद्यार्थांची तसेच शाळा बाह्य मुले अशी एकुण दीड लाख मुलांची तपासणी करण्यात येणार आहे.

याकामामध्ये रोटरी क्लब ऑफ पनवेल महापालिकेस सहकार्य करत आहे. पनवेल शहरामधील के. व्ही. कन्या प्रशाला आणि व्ही. के. हायस्कूलमधील विद्यार्थ्यांच्या तपासणीसाठीकरिता त्यांनी सहकार्य केले आहे. आत्तापर्यंत तपासणी झालेल्या २५ हजार ७७० बालकांपैकी एक हजार ४६५ बालकांची अधिक तपासणी करण्यात येणार आहे. यापैकी पाच बालकांना शस्त्रक्रियेकरिता पाठवण्यात येणार आहे

### वयोगटानुसार तपासणी

जागरूक पालक, सुदृढ बालक अभियानांतर्गत ०-१८ वर्षे वयोगटातील एकुण २५ हजार ७७० मुलांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. ०-६ वर्षे वयोगटातील तीन हजार ३३१ मुले तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. ६-१० वर्षे वयोगटातील सहा हजार ९६७ विद्यार्थी तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. १०-१८ वर्षे वयोगटातील १५ हजार ३२० विद्यार्थी तपासणी पूर्ण करण्यात आली आहे.

# नवीन पनवेलमध्ये मटण-मच्छी विक्रेत्यांसाठी मार्केट उभारावे

■ माजी नगरसेवक मनोज भुजबळ यांची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल मध्ये काही बेकायदेशीर मच्छी-मटण विक्रेते फूटपाथवर बसून विक्री करत असून याचा नाहक त्रास नियमित व नियमाने मार्केटमध्ये बसून मच्छी-मटण विक्री करणाऱ्यांना होत आहे. त्यामुळे बाहेर फूटपाथवर बसून मच्छी-मटण विक्री करण्यांना मज्जाव करावा तसेच त्यांच्यासाठी मार्केटमध्ये बसण्यासाठी सोय करून द्यावी, अशी मागणी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक मनोज भुजबळ यांनी आयुक्त गणेश देशमुख यांना निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात मनोज भुजबळ यांनी म्हटले आहे की, सिडकोने नविन पनवेलची रचना करताना कोणत्याही मुलभूत सोयी सुविधांचा विचार न करता नवीन पनवेलची उभारणी केली. त्यामुळे प्रत्येक सेक्टरमध्ये सार्वजनिक भाजीमार्केट, फळमार्केट, फूलमार्केट, मच्छीमार्केट व मटण मार्केटची सुनियोजित रचना केलेली नाही. यामुळे परिसरातील सर्व रस्त्यांचे फूटपाथ फेरीवाल्यांनी व्यापलेले आहेत. नवीन पनवेल सेक्टर १२ येथे मच्छी मार्केट असून तेथे कायदयाने पालन करुन मच्छी विक्रेते बसत आहेत, परंतु बेकायदेशिर फूटपाथवर बसून मच्छी विक्री करणाऱ्यांमुळे नियमित व नियमाने मार्केटमध्ये बसून मच्छी विक्री करणाऱ्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे मटण-चिकण व मच्छी विक्रेत्यांना नवीन पनवेलमध्ये मार्केटची सोय करून द्यावी.



### नागरिकांची गैरसोय थांबेल

मच्छी मार्केटच्या शेजारी सिडकोने मटण मार्केट बांधलेले आहे, मात्र सध्या हे मार्केट बंद पडून असून तेथे दलदल माजलेली आहे. त्यामुळे पनवेल महापालिकेने संपूर्ण नवीन पनवेलमधील मटण-चिकण व मच्छी विक्रेते यांना एकाच छताखाली बसण्याची सोय उपलब्ध करून द्यावी जेणेकडून शहराचे विद्रुपीकरण थांबेल व नागरिकांचे गैरसोय होणार नाही.



# पोलीस पाटील संघाची जिल्हा कार्यकारिणीची बैठक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य गाव कामगार पोलीस पाटील संघ रायगड जिल्हा कार्यकारिणीची बैठक पनवेल येथे बुधवारी (दि. २२) झाली. या वेळी विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात चर्चा करण्यात आली, तसेच या बैठकीत पनवेल तालुका पोलीस पाटील संघाच्या अध्यक्षपदी पांडुरंग जाधव (कोळखे पोलीस पाटील) यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या वेळी राज्य संघटक हरिश्चंद्र दुदुस्कर, रा.जि.पोलीस पाटील संघ अध्यक्ष संतोष दळवी, उपाध्यक्ष दिनेश पाटील, सचिव कुणाल लोंढे, चिटणीस विकास पाटील, पनवेल तालुका पोलीस संघाचे अध्यक्ष मिलिंद पोपेटा, उपाध्यक्ष संतोष गायकर, मिनाक्षी पाटील, सुप्रिया सदावर्ते- मुंगाजी, सुगंधा पारधी, खजिनदार प्रमोद नाईक, कार्याध्यक्ष विजय खुटले, जिल्हा कार्यकारिणी सदस्य, पनवेल तालुका पो.पा.संघाचे सर्व पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात टेक्नो ब्रिन्क

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या मार्फत २३ ते २५ फेब्रुवारी २०२३ यादरम्यान 'टेक्नो ब्रिन्क'च्या माध्यमातून वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या टेक्नो ब्रिन्कचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना आजच्या आधुनिक युगामध्ये वेगवेगळ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व माहिती व्हावी हा आहे. या टेक्नो ब्रिन्कच्या माध्यमातून येणाऱ्या तीन दिवसांमध्ये वेगवेगळ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्या स्पर्धा खालीलप्रमाणे आहेत: टेक-रंगोली, रिल्स, बी. जी. एम. आय, एन. एफ. एस, वादविवाद, कोडवार व प्रश्नमंजुषा, ऑनलाइन क्यूज, पी.पी.टी, ट्रेझर हंट व वेब डिझायनिंग या सर्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड, माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख प्रा. रश्मी पाटील, प्रा. महेश्वरी झिरपे (समन्वयक अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्ष) तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी ह्या सर्व स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मेहनत घेत आहेत तसेच या सर्वांनी महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थ्यी व विद्यार्थिनींना या सर्व स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यासाठी विनंती केली आहे.



**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक नितीन पाटील यांची उत्तर रायगड जिल्हा भाजपच्या सरचिटणीसपदी नुकतीच नियुक्ती करण्यात आली. याबद्दल त्यांचे भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, माजी नगरसेवक अनिल भगत व भाजप तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांनी अभिनंदन केले.**

### तरुणी बेपत्ता

**पनवेल :** कोळीवाडा येथून कामाला जाते असे सांगून घरातून बाहेर गेलेली तरुणी हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. शिवाणी वाघरी असे या तरुणीचे नाव असून तिचे वय २३ वर्ष, रंग सावळा, उंची पाच फुट दोन इंच, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, केस काळे व लांब, उजव्या हाताच्या पिढरीवर इंग्रजीमध्ये शिवाणी हे नाव गोंदलेले आहे. अंगात लाल टॉप, काळी ओढणी, सफेद जिन्स पॅन्ट आहे. तिला हिंदी, गुजराती, मराठी येत असून तिच्याबद्दल कोणाला अधिक असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार संदेश पाटील यांच्याशी संपर्क साधावा.

# पटवर्धन रुग्णालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त व्याख्यान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित 'सावरकर विचार दर्शन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या वेळी आपण छोट्या-छोट्या गोष्टींमधून सुद्धा राष्ट्रभक्ती करू शकतो असे मत ज्येष्ठ रंगकर्मी शरद पोंक्षे यांनी व्यक्त केले आहे.



पनवेल शहरातील विरुपाक्ष मंगल कार्यालय येथे आयोजित व्याख्यानात संबोधताना शरद पोंक्षे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज, स्वातंत्र्य वीर सावरकर, लोकमान्य टिळक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान नेत्यांनी आपल्यासाठी काय केले आहे, याची माहिती आपण पुढच्या पिढीपर्यंत पोहचवली पाहिजे. त्यामुळे त्यांच्यात आपल्या देशाविषयी आत्मीयता जागी होईल व या मातीची ओढ त्यांच्यामध्ये टिकून राहील, असे सांगितले.

या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन झाली. त्यानंतर मंदिर भिडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित 'जयोस्तुते श्रीमहन्मंगले' या गाण्याने उपस्थितांची राष्ट्रीय चेतना जागवली. या कार्यक्रमाला रा.स्व.संघ जनकल्याण समिती कार्यवाह तुकाराम नाईक, संस्था अध्यक्ष डॉ. रवींद्र ईनामदार, कार्यवाह राजीव समेळ, कोषाध्यक्षा अनुराधा ओगले, सह कोषाध्यक्ष चेतन जोशी, रुग्णालय मुख्य संचालक व्यवस्थापक सुनील लघाटे, वैद्यकीय अधिकारी डॉ. भक्ती सारंग, पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक मनोज भुजबळ, माजी नगरसेविका ॲड. वृषाली वाघमारे यांच्यासह मान्यवर व प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, कार्यक्रम सुरुवातीच्या अगोदर शरद पोंक्षे यांनी रा.स्व.संघ जनकल्याण समिती संचालित डॉ. प्रभाकर पटवर्धन स्मृती रुग्णालयाची पाहणी करत रुग्णालयाच्या माध्यमातून होत असलेल्या कामाची प्रशंसा केली. या वेळी रुग्णालयात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल जिबीन भास्करन, संचीता साखरे, वनीता बाचकर, गायत्री कदम यांचा शरद पोंक्षे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# शिवशक्ती मित्र मंडळातर्फे भाविकांना सरबताचे वाटप

**पनवेल : वार्ताहर**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त पनवेल शहरातील लाईन आली येथील सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले शिव शक्ती मित्र मंडळाकडून मिरवणूक सहभागी झालेल्या भाविकांसाठी सरबताचे वाटप करण्यात आले.

माजी नगरसेवक व शिवशक्ती मित्रमंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश गुडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळाचे पदाधिकारी व सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त मिरवणूक सहभागी झालेल्या भाविकांना सरबत चे वाटप केले. तसेच पनवेल महापालिकेच्या मार्फत 'स्वच्छ पनवेल-सुंदर पनवेल' ठेवण्याच्या आवाहनाला प्रतिसाद देत रिकामे ग्लास टाकण्यासाठी मंडळानी डस्टबिनची व्यवस्था केली होती. परंतु काही लोकांनी ग्लास रस्त्यावर टाकून दिल्याचे मंडळाच्या सदस्यांना लक्षात येताच त्यांनी स्वतः ग्लास उचलत परिसर स्वच्छ केला. त्यामुळे नागरिकांनी शिवशक्ती मित्र मंडळाच्या सदस्यांचे कौतूक केले.




**पनवेल महापालिका शहराला स्वच्छ ठेवण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवत आहे. यामध्ये आमचाही सहभाग व्हावा यासाठी आम्ही शिवजयंती निमित्त आयोजित मिरवणूकीत ठिकठिकाणी डस्टबिन ठेवले होते. तसेच परिसरात पडलेला कचरा कसलाही विचार न करता मंडळाच्या कार्यकर्त्यांनी स्वतः उचलला आहे.**
**-रमेश गुडेकर, संस्थापक-अध्यक्ष, शिवशक्ती मित्रमंडळ**

# पनवेलमध्ये होळीसाठी शेणींना मोठ्या प्रमाणात मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल परिसरात होळी सण उत्साहात साजरा केला जातो. होळीमध्ये जाळण्यासाठी लाकडाबरोबरच आता शेणींना मोठ्या प्रमाणात मागणी आली असल्याची माहिती करंजाडे येथील तबेल्याचे मालक भरवाड कुटुंबीयांनी दिली. त्यामुळे झाडे वाचवा-पर्यावरण वाचवा हा उद्देश ही सफल होताना दिसत आहे.



कोरोनामुळे मागील दोन वर्षे होळीचा सण मोठ्या प्रमाणात साजरा करता आला नाही. यावर्षी सगळीकडे होळी पारंपारिक पध्दतीने साजरी करण्यात येणार आहे. यंदा सोमवार ७ मार्च रोजी होळी आहे. पनवेल परिसरात रहिवाशी सोसायट्या उभ्या राहिल्या आहेत. प्रत्येक सोसायटीत होळी साजरी केली जाते. होळीसाठी मोठ्या प्रमाणात झाडे तोडून पर्यावरणाची हानी केली जात असते, पण आता झाडेच कमी झाली असल्याने होळीला लाकडे मिळत नाहीत. लाकडांना पर्याय म्हणून शेणींचा वापर केला जात असल्याने पनवेल परिसरात शेणींची मागणी वाढली आहे. इतर वेळी दोन रुपयांना विकली जाणारी शेणी बाजारात तीन ते पाच रुपयांना मिळत आहे.

पनवेलच्या करंजाडे परिसरात असलेल्या तबेल्याचे मालक भरवाड कुटुंबीयांचा शेणी विकण्याचा व्यवसाय आहे. भावनागरहून ४२ वर्षा पूर्वी हे कुटुंब पनवेलमध्ये आले. या कुटुंबात झीलू लाखा भरवाड सर्वांत ज्येष्ठ महिला आणि त्यांची सून मिना भुपा भरवाड या शेणी बनवतात दिवसाला हजार शेणी त्या बनवितात. पूर्वी म्हशी जास्त असल्याने रोज २६-२७ घमेली शेण असायाचे त्यावेळी त्यांची नात सून खोपा भरवाड व इतर कुटुंबीय त्यांना मदत करीत असे. आता पर्यंत दोन दिवसांत पाच हजार शेणींची विक्री झाली आहे. पुढच्या दोन-तीन दिवसांत यापेक्षा जास्त विक्री होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

होळीसाठी लाकडे वापरून पर्यावरणाची हानी होते. त्यामुळे वातावरणातील उष्णता वाढते त्याचा परिणाम पर्जन्यावर ही होत असल्याचे दिसून आले आहे. होळीसाठी शेणींचा वापर सुरू होणे हे चांगलेच आहे. याशिवाय गाईच्या शेणापासून मशीनवर बनवलेली होळी स्टिकचा ही सध्या वापर केला जातो. दोन फुटाची ही स्टिक ७०० ग्राम ते एक किलोच्या आसपास असते. एक स्टिक १० ते १५ रुपये दराने मिळते. एका सोसायटीला ७५ ते १०० अशा स्टिक पुरेशा होतात. एक गाव एक होळी, किंवा एक आळी एक होळी अशी संकल्पना आता राबवायला हवी, यामुळे झाडे वाचवा-पर्यावरण वाचवा हा उद्देश सफल व्हायला मदत होईल.

# रोडपाली येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात



**पनवेल : वार्ताहर**

शिवजयंतीनिमित्त रोडपाली कळंबोली येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह आणि कीर्तन महोत्सव, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा २० ते २७ फेब्रुवारीपर्यंत आयोजित करण्यात आला आहे. शिवसह्याद्री प्रतिष्ठान व वारकरी सांप्रदाय रोडपाली यांच्या माध्यमातून रोडपाली सेक्टर १५ येथील शंभुराजे चौक मैदानात सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहानिमित्त महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांचे किर्तने आयोजित करण्यात आल्याने भाविकांना श्रवणसुखाची पर्वणी ठरणार आहे, अशी माहिती श्रीकांत फाळके यांनी दिली आहे.

याचप्रमाणे दररोज पहाटे काकड आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, गीतापाठ, प्रवचन, नित्यपाठ व हरिपाठ, कीर्तन त्यानंतर जागर असा कार्यक्रम असणार आहे. या कार्यक्रमाला शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख रामदास शेवाळे यांचे सहाय्य लाभले. नागरिकांनी या सप्ताहाचा लाभा घ्यावा, असे आवाहन आयोजक नारायण फडतरे व नितिन गुलदगड यांनी केले आहे.

## संपादकीय

# एक पाऊल पुढे

शिवसेना हा पक्ष आणि धनुष्यबाण ही निशाणी हातात आल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे यांनी आपला पक्ष मूळ कार्यक्रमानुसारच चालत असल्याची ग्वाही दिली आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या शिवसेनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत ही ग्वाही अधिकृतपणे दिली. या बैठकीत त्यांचीच पक्षाचे मुख्य नेते म्हणून विधिवत निवड करण्यात आली. या बैठकीत त्यांनी घेतलेले निर्णय आणि जाहीर केलेला कार्यक्रम जुन्या शिवसेनेची आठवण करून देणारा आहे.

**मनातील हेतू शुद्ध असला की यश हमखास मिळतेच. विरोधकांनी कितीही अडथळे आणले तरी प्रत्येक पाऊल पुढेच पडते याचे प्रत्यंतर गेल्या काही दिवसांत शिंदे-फडणवीस सरकारला आणि त्यांच्या समर्थकांना येत असेल. शिवसेनेचे गलबत फुटून मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे विराजमान झाल्यानंतर उरलेल्या शिवसेनेतील गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेऊन अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. प्रकरण निवडणूक आयोगाच्या दरबारीही दाखल झाले. शिवसेना नेमकी कोणाची हा मूलभूत प्रश्न सोडविला जाणे आवश्यक होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसैनिक हीच खरी शिवसेना असल्याचा अभूतपूर्व निवाडा निवडणूक आयोगाने दिला. याचा अर्थ स्पष्ट आहे की आता शिवसेनेत संस्थापक ठाकरे घराण्यातील कोणाला थारा उरला नाही. वास्तविक ही घटना दु:खद म्हणावी अशी कारण ठाकरे घराण्याचे नाव शिवसेनेशी अभिन्नपणे जोडले गेले होते. तथापि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी खुर्चीच्या मोहापायी शिवसेनेची आजवरची सर्व पुण्याई काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या दावणीला बांधल्यानंतर असे काही घडणे अटळ होते. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांचा विचार वाचवण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांनाच हिंमतीने पावले उचलावी लागली. १९६६ साली शिवसेनेची स्थापना करताना स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी पक्षाचा म्हणजेच पर्यायाने मराठी माणसाचा अजेंडा जाहीर केला होता. त्याच अजेंड्याची आठवण करून देणारा कार्यक्रम मुख्यमंत्री शिंदे यांनी कार्यकारिणीत घोषित केला. यातून त्यांचे राजकीय चातुर्य दिसतेच, परंतु स्व. बाळासाहेबांचा विचार प्रामाणिकपणाने पुढे नेण्याचा शुद्ध हेतूदेखील स्पष्ट होतो. महाराष्ट्रात येऊ घातलेल्या उद्योगांत स्थानिकांना ८० टक्के नोकऱ्या, मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्याची मागणी, स्वातंत्र्यवीर सावरकर यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार बहाल करण्याची मागणी अशा अनेक घोषणा आणि मागण्यांचा समावेश या कार्यक्रम पत्रिकेत आहे. विशेष म्हणजे पक्षासाठी शिस्तपालन समितीची स्थापना करण्याचा प्रस्ताव या बैठकीत मंजूर करण्यात आला. शिस्तपालन समिती ही शिवसैनिकांसाठी नवेच प्रकरण असेल कारण या आधी कधीही अशा समित्या पक्षामध्ये नव्हत्या. वीरमाता अहिल्याबाई होळकर आणि छत्रपती संभाजीराजे यांची नावे राष्ट्रपुरुषांच्या यादीत समाविष्ट करण्याची बाब असो किंवा मुंबईतील चर्चगेट रेल्वेस्थानकाला माजी अर्थमंत्री चिंतामणराव देशमुख यांचे नाव देण्याची मागणी असो या साऱ्या गोष्टी बाळासाहेब ठाकरे यांच्याशी थेट नाते सांगणाऱ्या आहेत. काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस सोबत सत्ता वाटून घेतल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा जोश ओसरला होता. आगामी महापालिका निवडणुकीमध्ये मराठी अस्मितेचा वापर करण्याचा एकमेव पर्याय त्यांच्याकडे शिल्लक आहे हे लक्षात घेऊनच मुख्यमंत्री शिंदे यांनी चातुर्याने मराठी अजेंडा घोषित केला आहे. लढाईच्या पहिल्या फेरीत तरी शिंदे यांनी उद्धव ठाकरे आणि त्यांच्या समर्थकांना धोबीपछाड दिली हे मान्य करावे लागेल. न्यायालयीन लढाईत मुख्यमंत्री शिंदे यांचे एक पाऊल पुढे पडले यात शंका नाही.**

# पोलादपूरात गुरे वाहतूक, गोवंश हत्येचे प्रकार वाढले



**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात गोवंशाचे मांस आढळून आले असल्याने गोवंश हत्त्येची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणामध्ये गोरक्षक तरूणांना कायदेशीर अधिकार आहे काय तसेच छापा घालताना महिलांना अश्लिल शिवीगाळी करणे माफ आहे काय, असे काही व्हिडीओ व्हायरल झाल्याने प्रश्न निर्माण झाले आहेत. एकूणच, पोलादपूर तालुक्यात गुरे वाहतूक आणि संशयास्पद गोवंश हत्याप्रकरणामध्ये मध्यस्थांची भुमिका आणि अचानक देवाणघेवाणीचा संदर्भ उद्‌भवत आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये शेतकऱ्यांच्या पाळीव पशूंची वाहतूक आणि कत्तलीसाठी खरेदी मोठ्या प्रमाणात होत असून दोन वाहनांसह सुमारे सात बैल आणि रेडे हस्तगत करण्यात पोलादपूर पोलीस ठाण्याला यश आले आहे.

पोलादपूर दिशेने महाबळेश्वरकडे जाणाऱ्या वाहनातून सुरू असलेली गोवंश वाहतूक रोखण्यात गोरक्षक श्रीशिवप्रतिष्ठान महाबळेश्वर शाखा आणि बजरंगदलासह समाजसेवी कार्यकर्त्यांना यश आले असून याप्रकरणी महाबळेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल करून पोलादपूर पोलिसांकडे हे प्रकरण पुढील तपासासाठी वर्ग केले आहे.

पोलादपूर तालुक्यातील ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात गायी आणि गुरांच्या संदर्भात होणारे देवघेवीचे व्यवहार सध्या गोरक्षकांच्या उत्साहामुळे संशयास्पद ठरत आहेत. यातच गुरांची अवैध वाहतूक करताना बुधवारी रात्रीच्या सुमारास पकडलेली जीप पोलादपूर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन केली. यानंतर पोलीस तपास सुरू झाला असून कोणत्याही प्रकारचा शांतताभंग न करता ही कारवाई पूर्ण करण्यासाठी सर्वांकडून सहकार्य केले जात आहे.

तालुक्यातील मुंबई ते गोवा नॅशनल हायवे क्र.१७ लगतच्या धामणदिवी गावातील सहा शेतकऱ्यांच्या पाच गायी आणि सहा बैल शुक्रवारी व रविवारी आणि मंगळवारी रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याने तालुक्यात खळबळ उडाली आहे. पोलादपूर पोलिसांकडून चोरांचा तपास करण्यापूर्वी शेतकऱ्यांच्याच तक्रार अर्जाची चौकशी करून सत्यासत्यता पडताळण्यात आली.

पोलादपूर तालुक्यात सातत्याने घडणाऱ्या गुरे चोरीच्या घटनांमुळे आता तालुक्यातील शेतकऱ्यांनी गोसंरक्षणाची गरज लक्षात घेऊन संघटीतपणे प्रयत्न करण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्त्यांनी येथे केले आहे. दरम्यान, धामणदिवी ग्रामस्थांनी या गुरेचोरी प्रकरणाचा तपास न लागल्यास वेगळया पध्दतीने आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

पोलादपूर येथील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरून मंगळवारी पहाटे बेकायदेशीर आणि निर्दयतेने गुरांची वाहतूक करणारा ट्रक ट्रॅफिक पोलिसाने अडवून एका ढाब्याजवळ उभा केला आणि संबंधित व्यक्तींकडे कागदपत्रांची मागणी केली. या वेळी कागदोपत्री निर्वेधता सिध्द करू शकत नसल्याने पुरावे आणा मगच ट्रक हलवा, अशी भूमिका ट्रॅफिक पोलिसाने घेतल्यानंतर ट्रक तेथेच सोडून संबंधित व्यक्ती निघून गेल्या. यानंतर सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास पोलादपूरमधील काही कार्यकर्त्यांना याचा सुगावा लागल्याने ढाब्याजवळ जमाव जमला आणि त्यानंतर पोलादपूरच्या पेट्रोलपंपात आणून गुरांना चारा-पाणी दिले गेले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने रात्री ही गुरे कोलाडच्या गोशाळेत गुरे रवाना करण्यात यश मिळविले, मात्र यादरम्यान पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये अनेकदा शाब्दीक चकमकी उडत असल्याने तब्बल तीन तास तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. काही कार्यकर्त्यांना कत्तलीसाठी जाणाऱ्या गुरांचा ट्रक पोलीसांनी पकडल्याची माहिती मिळाल्यावरून मोर्या ढाब्याजवळ सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास जमाव जमला. या वेळी पोलिसांना पाचारण करून गुरे चारा-पाण्याविना दिवसभर असल्याने त्यांना चारापाण्यासाठी ट्रकबाहेर काढण्याची मागणी करण्यात आली. पीएसआय संदीप पाटील यांनी पोलीस स्टेशनमध्ये ट्रक (एमएच ०४ बीजी १९५२) नेऊन मगच गुरांना चारापाणी देण्याचा निर्णय घेतल्याने सर्व कार्यकर्ते पोलीस ठाण्याकडे रवाना झाले.

या वेळी सर्व कार्यकर्त्यांनी पोलीस इन्स्पेक्टर सुरेश अंधारे यांच्याकडे तक्रार अर्ज देऊन गुरांचा ताबा स्थानिकांकडे देण्यात येऊन कत्तलीसाठी गुरे नेणाऱ्यांविरूध्द कठोर कारवाई करण्याची मागणी केली. पहाटेच्या सुमारास पोलीस बंदोबस्तामध्ये सर्व १७ गुरांना कोलाडच्या गोशाळेमध्ये दाखल करून कार्यकर्ते घरी परतले. याप्रकरणी पोलादपूर पोलीस स्टेशनमध्ये मंगळवारी रात्री अज्ञात आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात ६३ हजार रूपये किंमतीची १७ गुरे आणि पाच लाख रूपये किंमतीचा ट्रक अशी मालमत्ता ताब्यात घेण्यात आली असून पोलीस सबइन्स्पेक्टर संदीप पाटील हे पोलीस इन्स्पेक्टर सुरेश अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करीत आहेत.

पोलादपूर तालुक्यातील वावे मोहल्ल्यामध्ये रविवारी पहाटेच्या सुमारास गोवंश हत्या झाल्याची खबर मिळताच पोलादपूर शहर परिसरातील १० गोवंश रक्षक तरूणांनी तातडीने छापा टाकल्याने पोलादपूर पोलीसांनी घटनास्थळी जाऊन केलेल्या कारवाईमध्ये दोन आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील वावे मोहल्ल्यामध्ये नेहमीच एका घरामध्ये गोवंश हत्या करून गोवंश मांस विक्री केली जात असल्याची माहिती मिळाल्यावरून पाळतीवर असलेल्या १० गोवंशरक्षक तरूणांनी रविवारी पहाटेच्या सुमारास छापा घालून पोलादपूर पोलिसांना पाचारण केले. या वेळी तिघेजण गोवंशाची कत्तल करून मांसविक्री करीत असल्याचे निदर्शनास आले. पोलादपूर पोलिसांनी रविवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास पोहोचून घटनास्थळावरून लाकडी मुठ असलेला सुरा, लागडी गोल आकाराचा ओंडका, एक स्टीलची बादली, एक पांढऱ्या रंगाचा मळकट प्लास्टीकचा मग, एक निळया व सिल्व्हर रंगाचा मेणकापडाचा तुकडा, एक पिवळया रंगाची नायलॉनची रस्सी, दोन निळया रंगाचे प्लास्टीकचे पिंप, एका तांबड्या रंगाच्या गोवंश नरजातीचे कापून ठेवलेले मांसाचे पाच तुकडे असा मुद्देमाल हस्तगत केला. पोलादपूर पोलिसांनी याप्रकरणी घटनास्थळावरून तिघांना ताब्यात घेतले. याप्रकरणी दोघांविरूध्द दखलपात्र गुन्हा दाखल करून अटक केली. एका प्रभावी व्यक्तीच्या मध्यस्थीने एका तरुणाची अटक टळल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यात गोवंश हत्या बंदीसाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जाणार असून नजिकच्या काळात मांसविक्रीच्या उद्देश्याने हत्येसाठी दिल्या जाणाऱ्या जनावरांचे मालकही या गोवंश रक्षकांच्या रडारवर येणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या प्रकरणात एका तरुणाविरूध्द ताब्यात घेऊनही कारवाई न झाल्यामागे कोणाचातरी हात असल्याबद्दल चर्चा असून हा छापा एका रेस्क्यू टीमने घातला की गोरक्षक तरूणांच्या संघटनेने याबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# इन्स्टाग्रामवर फॉलोवर्स वाढविण्यासाठी 'ही' सोपी ट्रिक

अनेक जण हल्ली इन्स्टाग्रामचा व्यावसायिक वापर करतात. त्यामुळे त्यांना इन्स्टाच्या लाईक्स, व्ह्यूज यांच्यासह पोस्टखालील कमेंट्स देखील महत्त्वाच्या असतात. या कमेंट्समार्फत त्यांची पोस्ट इतरांना आवडली का नाही हे समजते. याच कमेंट्सद्वारे यूजर्सना आपल्या इन्स्टा अकाऊंटकडे आकर्षित करता येऊ शकते. यासाठी पिन हा एक बेस्ट ऑप्शन आहे असे मानले जाते. या ऑप्शनच्या माध्यमातून एखादी आकर्षक कमेंट पिन करुन त्याचा फायदा व्ह्यूज आणि सोशल मीडिया एन्गेजमेंटसाठी करता येऊ शकतो.



**इन्स्टाग्राम रिलमधील कमेंट पिन करण्यासाठी खालील स्टेप्स करा फॉलो करा...**

इन्स्टाग्राम ॲप सुरू करा. उजव्या बाजूला कोपऱ्यामध्ये असलेल्या प्रोफाइल फोटोवर क्लिक करून प्रोफाइलवर जा. रिल सेक्शनमधील निवडलेल्या रिलवर जा आणि कमेंट्स ऑप्शनवर क्लिक करा. जी कमेंट पिन करायची आहे, तिच्यावर काही सेंकद क्लिक करा. तेथे पिनचे ऑप्शन दिसेल, त्यावर क्लिक केल्याने ती कमेंट पिन होईल. जर तुम्ही आयफोन वापरत असाल, तर क्लिक करण्याऐवजी कमेंट स्वाईप करा.(कमेंट अनपिन करण्यासाठी पुन्हा याच स्टेप्स पुन्हा वापरा. इन्स्टाग्रामवरील कोणत्याही रिलवर ३ कमेंट्स पिन करता येतात.)

**इन्स्टाग्राम लाइव्हमधील कमेंट पिन करण्यासाठी खालील स्टेप्स करा फॉलो करा...**

इन्स्टाग्राम ॲप सुरु करा. त्यात मध्यभागी क्रिएट (create +) हे ऑप्शन दिसेल. (जर तुम्ही आयफोन वापरत असाल, तर हे ऑप्शन वर दिसेल) त्यावर क्लिक केल्यावर तुमच्या फोनची गॅलरी दिसेल. तेव्हा गॅलरीच्या ऑप्शनवरून लाइव्हच्या ऑप्शनवर क्लिक करा. तेथे बाजूला टायटल लिहिलेले दिसेल, यामध्ये लाइव्हबद्दल थोडक्यात लिहून त्याची माहिती देऊ शकता. तुम्ही ऑडियन्सदेखील निवडू शकता. आता लाइव्हवर क्लिक केल्यावर इन्स्टाग्राम लाइव्ह सुरू होईल. त्यावर कमेंट्स यायला लागतील. आलेल्या कमेंट्सपैकी निवडलेल्या कमेंटवर काही सेकंद क्लिक करा. पुढे तेथे पिन असे लिहिलेले दिसेल. त्यावर क्लिक केल्याने ती कमेंट पिन होईल. (कमेंट अनपिन करण्यासाठी त्यावर क्लिक करा. तेथे अनपिन हे ऑप्शन येईल. तुम्ही स्वत: कमेंट करुन ती कमेंट सुद्धा पिन करु शकता. इन्स्टाग्राम लाइव्हची सेवा फक्त मोबाईल फोन्सवर उपलब्ध आहे. संगणकावर लाइव्ह करणे सध्या अशक्य आहे.)

# आंतरराष्ट्रीय मानक संस्थेची (आयएसओ) स्थापना

**निमित्त**

जनतेला व्यावहारात लागणाऱ्या नानाविध वस्तू आणि उत्पादकांना लागणारा विविध कच्चा माल यथायोग्य गुणवत्तेचा ठरावा म्हणून आणि उत्पादित पदार्थ वापरण्यास समाधानकारक व्हावेत या दृष्टीने त्यांमध्ये कोणते गुणधर्म आवश्यक आहेत व ते किती प्रमाणात असले पाहिजेत ते ठरविणारी आणि या गुणधर्माचे मूल्यमापन करण्याच्या कसोट्या निश्चित करणारी केंद्रशासित भारतीय संस्था.

ही संस्था २३ फेब्रुवारी १९४७ मध्ये उद्योगपती, वैज्ञानिक, तंत्रज्ञ आणि ग्राहक यांच्या पाठिंब्याने केंद्र सरकारने स्थापन केली व १९६२ मध्ये 'इंडियन स्टँडर्डस इन्स्टिट्यूशन ॲक्ट' या कायद्याने तिला कायदेशीर मान्यता प्राप्त झाली. केंद्रीय उद्योग मंत्री या संस्थेचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. संस्थेच्या सर्वसाधारण परिषदेमध्ये केंद्र व राज्य सरकारे, औद्योगिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक संस्था यांचे आणि संस्थेच्या विभागीय समित्यांचे व वर्गणीदारांचे प्रतिनिधी असतात. संस्थेचे मुख्य कार्यालय दिल्ली येते आहे. याखेरीज संस्थेची विभागीय कार्यालये मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे असून शाखा कार्यालये अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, चंढीगढ, हैदराबाद, कानपूर, पाटणा, त्रिवेंद्रम व जयपूर येथे आहेत. आरंभी संस्थेच्या खर्चाचा ९० टक्क्यांहून जास्त भार केंद्र शासन उचलीत असे परंतु अलीकडे संस्थेच्या सु. ४ कोटी रुपयांच्या वार्षिक अर्थसंकल्पाचा फक्त २० – ४० टक्के अंश शासकीय अनुदानाने व बाकीचा सर्व बोधचिन्हांच्या परवाना शुल्कातून आणि मानक विनिर्देश संहितांच्या विक्रीतून भागविला जातो. त्यामुळे ही संस्था स्वायत्त स्वरूपाची आहे.

संस्थेमध्ये भारतीय परिस्थितीचा विचार करून व्यवहारोपयोगी वस्तूंमध्ये त्या यथायोग्य व्हाव्या म्हणून कोणते गुणधर्म असणे आवश्यक आहे व ते किती प्रमाणात असले पाहिजेत आणि त्यांचे मूल्यमापन कोणत्या कसोट्या वापरून करावे हे ठरविण्यासंबंधीचे कार्य चालते. त्यासाठी तज्ञ समित्या असून त्यांमध्ये त्या त्या विभागातील तज्ञ आणि उद्योगपती व ग्राहक यांचे प्रतिनिधी असतात. अशा दहा समित्या १९८२ मध्ये अस्तित्वात असून त्यांच्या कार्यक्षेत्रात कृषी व अन्न पदार्थ, रसायने, स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये लागणारे साहित्य, सामान्य उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे, विद्युत् तांत्रिक सामग्री, इलेक्ट्रॉनीय व दूरसंदेशवाहन सामग्री, सागरी व अन्य प्रकारची मालाची वाहतूक व मालाची आवेष्टने, यांत्रिक अभियांत्रिकीय सामग्री, संरचनात्मक सामग्री व धातू, वस्त्रे, खनिज तेलजन्य पदार्थ आणि तत्संबंधित उत्पादने इत्यादींचा समावेश आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध घटकांत मानकीकरणाची योग्य जाणीव निर्माण करण्यासाठी भारतातील निरनिराळ्या महत्त्वाच्या ठिकाणी प्रतिवर्षी अधिवेशने भरविण्यात येतात. निरनिराळ्या उद्योगांत मानकीकरण आणि गुणवत्ता नियंत्रण यांच्या बाबतीत उद्भवणाऱ्या प्रश्नांसंबंधी चर्चा करण्यासाठी उद्योगांनुसार विशिष्ट विषयावरील परिषदा व चर्चासत्रे अयोजित करण्यात येतात. मानकीकरणाचे महत्त्व पटविण्यासाठी संस्थेतर्फे मानकदूत हे हिंदी भाषेतील त्रैमासिक १९८१ पासून प्रसिद्ध करण्यात येत आहे. नवनवीन भारतीय आणि परदेशी मानकांसंबंधी वर्गीकरण केलेली माहिती उपलब्ध करून देण्यासाठी 'माहितीपेढी'ची स्थापना करण्यात आलेली असून या माहितीचा प्रसार करण्यासाठी स्टँडर्डस वर्ल्ड ओव्हर-मंथली डिशन्स हे मासिक माहितीपत्रक प्रसिद्ध केले जाते.

आतापर्यंत आशिया, आफ्रिकी व लॅटिन अमेरिका यांतील २५ विकसनशील देशांनी या संस्थेची मानके स्वीकारली आहे.

**(साभार : विश्वकोष मराठी)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : शहरातील गावदेवी मंदिराजवळील श्री स्वामी समर्थ मठात मंगळवारी पालखी सोहळा आयोजित करण्यात आला होता. मठामध्येही आकर्षक सजावट करण्यात आली होती. दरम्यान, शहरातून स्वामींची पालखी फिरविण्यात आली. यामध्ये शेकडो भाविकांनी सहभाग घेतला होता.** (छाया : अवधूत सुधाकर घरत)

## आरोग्य प्रहर

# प्रवासात होतोय उलटीचा त्रास तर 'या' उपायांनी मिळेल आराम

प्रवासामध्ये काही जणांना कार, फ्लाइट किंवा ट्रेनमध्ये जास्त वेळ बसणे कठीण जाते. या समस्येला 'मोशन सिकनेस' म्हणतात. असे लोक इतरांप्रमाणे लांब प्रवासाचा आनंद घेऊ शकत नाहीत. मोशन सिकनेस ही एक कठीण स्थिती असू शकते. कारण हा त्रास होणाऱ्या लोकांना चालत्या वाहनांमध्ये मळमळ झाल्यासारखे वाटते, क्वचित उलटीचा त्रासही होऊ शकतो. तुम्हालाही गाडीत बसल्यावर असा त्रास होत असेल तर तो टाळण्यासाठी काही घरगुती उपाय जाणून घ्या. ते फॉलो केल्याने तुमचा प्रवास आरामदायी होऊ शकतो.



**बडीशेप** – जेव्हा तुम्हाला मळमळ होत असेल तेव्हा बडीशेप तुम्हाला त्यापासून वाचवू शकते. रेस्टॉरंटमध्ये जेवणानंतर बडीशेप का दिली जाते, याचा तुम्ही कधी विचार केला आहे का? कारण बडीशेप ही पचनासाठी उत्तम मानली जाते. बडीशेपमध्ये कार्मिनिटिव्ह गुणधर्म असल्याचे म्हटले जाते, याचा अर्थ ते गॅस आणि सूज कमी करण्यास मदत करते. त्यामुळे पुढच्या वेळी वाहनात बसतानाचा बजीशेप सोबत ठेवून ती चघळत रहा.

**विना साखरेची बिस्कीटे** – जेव्हा तुम्हाला मळमळल्यासारखे वाटत असेल तेव्हा साखर नसलेली बिस्किटे खा. ती फायदेशीर आहेत कारण त्यामध्ये स्टार्च जास्त असतो, जो तुमच्या सिस्टममध्ये संतुलन राखण्यास मदत करतो.

**केळं** – केळं हे तुम्हाला तुमची उर्जा पातळी राखण्यास मदत करते. प्रवासात तुम्ही आजारी पडल्यास (उलट्या किंवा जुलाब) तुम्हाला अशक्तपणा जाणवतो आणि तुमच्या शरीरात पोटॅशियम कमी होऊ शकते. अशा परिस्थितीत जर तुम्हाला मोशन सिकनेसचा त्रास होत असेल तर केळं खाणं हा एक चांगला पर्याय आहे. ते निरोगी पचन करण्यासदेखील मदत करतात.

**वेलची –** आलं आणि बडीशेप व्यतिरिक्त, प्रवासादरम्यान एक किंवा दोन पूर्ण वेलची चघळल्यानेदेखील मोशन सिकनेसचा प्रभाव बर्याच प्रमाणात कमी होतो. वेलची ही आपल्या स्वयंपाकघरात सहज उपलब्ध असते. शिवाय, त्यासाठी फार तयारी करावी लागत नाही. गाडीत बसण्यापूर्वी केवळ ती आठणीने बॅगेत सोबत ठेवा.

**ज्येष्ठमध –** ज्येष्ठमध हा आणखी एक फायदेशीर घटक आहे जो मळमळ आणि अपचनापासून आराम देऊ शकतो. ते बारीक वाटून, पूड करून पाण्यात मिसळता येऊ शकते. तुम्ही ज्येष्ठमध पावडर चहामध्ये घालूनही पिऊ शकता. हर्बल टी आणि काढा प्यायल्यानेही मोशन सिकनेसचा त्रास कमी होतो, असे मानले जाते. या पेयांमध्ये सामान्यतः मसाल्यांचे पौष्टिक मिश्रण असते आणि त्यात कॅफिनचे प्रमाण फारच कमी असते.

# स्वामित्व योजना आणि महसूल विभागाचा कोणताही संबंध नाही!

## ■ म्हसळा तहसीलदारांचे ‘अगाध’ ज्ञान



**म्हसळा : प्रतिनिधी**

स्वामित्व योजना ही केंद्र सरकारची एक महत्त्वाची आणि ऐतिहासिक योजना मानली जाते. या योजनेचा तहसीलदार हा महत्त्वाचा घटक आहे. या योजनेबाबत म्हसळ्यातील नागरिक तहसील कार्यालयात गेले असता त्यांना तहसीलदारांनी ही योजना आणि महसूल विभागाचा कोणताही संबंध नाही, असे सांगितल्याने म्हसळा तहसीलदार समीर घारे यांनी नागरिक आणि पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत केल्याने एकच खळबळ उडाली आहे. यावरुन त्यांचे अगाध ज्ञान किती आहे. हे स्पष्ट होत आहे. खामगाव येथील चुना मार्कीग कालावधी संपल्यानंतर तहसीलदार यांची भेट घेतली, त्यावेळी तहसीलदारांनी हे वक्तव्य केले. त्यावेळी नायब तहसीलदार, महसुल नायब तहसीलदार आणि सर्कल इन्स्पेक्टर तहसीलदार यांच्या केबीनमध्ये उपस्थित होते.

केंद्र सरकार आपल्या देशातील ग्रामीण भागातील नागरिकांसाठी विविध योजना नेहमी सादर करीत असते. त्यापैकी एक नविन योजना जिचे नाव आहे. पंतप्रधान स्वामित्व योजना. या योजने अंतर्गत देशातील ग्रामीण भागातील नागरिकांना E Property कार्ड वितरीत करण्यात येणार आहे.

स्वामित्व योजना ही केंद्र सरकारची एक महत्त्वाची आणि ऐतिहासिक योजना मानली जाते. २४ एप्रिल २०१९ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून स्वामित्व योजनेच्या उद्घाटनाची घोषणा केली आणि सुरुवात केली. ही योजना म्हसळा तालुक्यात प्रत्यक्षात ३१ जाने २०२३ पासून सुरु होत आहे. यासाठी उपअधिक्षक भूमि अभिलेख म्हसळाने ३ ते १७ फेब्रुवारी असा कालबध्द कार्यक्रम जाहिर करून एकाच वेळी आपल्या वरीष्ठ कार्यालयाना, तसेच उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन, तहसीलदार म्हसळा, गटविकास अधिकारी म्हसळा, पोलीस निरीक्षक या सर्वांना माहीतीसाठी कळविले होते.

नियोजित दौऱ्यानुसार गावठण चुना मार्कीग या कार्यक्रमाला भूमी अभिलेखची मंडळी गावात का पोहचत नाही. याची जनतेसाठी माहीती घेण्यास पत्रकार तहसीलदार यांचेकडे गेले असता स्वामित्व योजना आणि म्हसळा महसूल विभाग असा कोणताही संबंध नाही असे दुरुत्तर तहसीलदार म्हसळा यानी केले. त्यानी आपल्या महसूल खात्याजवळील निगडीत माहिती नागरिकाना न देता एक प्रकारे सेवा शर्तीचे उल्लंघन केले आहे.

वास्तविक पाहता भूमि अभिलेख म्हसळाने ३ ते १७ फेब्रुवारी २०२३ असा कालबध्द कार्यक्रम जाहीर केला त्याची प्रसिध्दी शासनाचे नियमानुसार वृत्तपत्रांत देणे जरुरीचे असताना ज्या खात्याचा (तहसीलदार) संबंध नाही त्या खात्याकडे माहीती देण्यापेक्षा तालुका प्रेस क्लबकडे देणे योग्य ठरले असते. सरकारची योजना राज्य शासनाच्या संमती आणि सहकार्याने होत आहे. तालुका पातळीवर तहसीलदार यांची मुख्यसमन्वयक अशी भूमिका असावी अशी शासन, जनता स्थानिक लोकप्रतिनिधी यांची असते. तहसीलदार यानी या योजनेचा अपमान करतानाच रायगडचे संसदेतील खासदार आणि श्रीवर्धन विधानसभा सदस्य यांचा आणि जनतेचाही अपमान केला आहे, अशी खंत ताम्हणेचे सेवानिवृत्त अधिकारी यांनी व्यक्त केली.

# अलिबागमधील शासकीय मुकबधीर विद्यालय इमारतीचे काम रखडले

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबागमधील शासकीय मुकबधीर विद्यालयाच्या इमारतीचे काम रखडले आहे. मुदत संपूनही ही इमारत पूर्ण झालेली नाही. त्यामुळे मुकबधीर विद्यालय सध्या खाजगी जागेत चालवण्यात येत आहे. त्याचे भाडे शासनाला भरावे लागत आहे.



जिल्ह्यातील मुकबधीर विद्यार्थी इथे शिक्षण घेतात. अलिबाग वरसोली विद्यानगर येथे मुकबधीर विद्यालयाची इमारत होती. या इमारतीमध्ये शाळा, विद्यार्थ्यांची निवासाची सोय तसेच समाज कल्याण विभागाशी संबंधित इतर कार्यालये देखील होती. मात्र खूप वर्ष जुनी असलेली ही इमारत जीर्ण झाली होती. तिची पडझड सुरू झाल्यानंतर नवी इमारत बांधण्याचा प्रस्ताव समाजकल्याण विभागाने शासनाकडे पाठवला होता. दरम्यानच्या काळात मुक बधीर विद्यालय इमारत धोकादायक असल्याने येथील शाळा आणि कार्यालये खाजगी जागेत स्थलांतरित करण्यात आली आहे. जीर्ण झालेली इमारत पूर्णतः पाडण्यात आली.

१५ ऑगस्ट २०२१ रोजी नव्या इमारतीच्या भूमिपूजनाचा सोहळा पार पडला. शासकीय मुक बधीर विद्यालय नव्या इमारतीच्या कामाचा आदेश ४ जुलै २०२२ रोजी दिला. ९६ लाख ५४ हजार ६०६ रुपये निधी मंजूर असून ठेकेदार याने सहा महिन्यात काम पूर्ण करून द्यायचे आहे. ठेकेदाराने तळमजल्याचे वर्ग खोल्याचे बांधकाम पूर्ण करून द्यायचे होते. त्यानंतर पहिल्या मजल्यावर वसतिगृह बांधकामास मंजुरी मिळणार होती. परंतु अद्याप इमारतीचे काम सुरु केलेले नाही.

## सावधान नोटीस

सर्व लोकांस या सावधान नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, मौजे उसर्लीखुर्द, ता. पनवेल, जि. रायगड येथील गट नं. २३, क्षेत्र ००-६१-५० हे.आर. पॉ., आकार रु. ६.४४ पै. पैकी ०-३०-५० हे.आर. पॉ. ही मिळकत आमचे अशिल मे अष्टविनायक इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे भागीदार श्री. गणेश रामकिशन पाटील व सौ. स्नेहल सुरेंद्र मोहिते यांनी श्री. हरेश हिरामण म्हात्रे, श्री. श्रीधर हिरामण म्हात्रे, श्रीमती नंदा महादेव खुटारकर, श्री. लहू गोविंद म्हात्रे, श्री. अंकुश गोविंद म्हात्रे, श्री. भगवान गोविंद म्हात्रे, श्रीमती अपर्णा दिपक कदम, श्री. उमेश माया म्हात्रे, श्री. आशिर्वाद माया म्हात्रे, श्रीमती दुर्गा महादेव म्हात्रे यांच्याकडून विकसनाकरीता दि. २४/०७/२०२१ रोजीच्या कराराने घेतलेली आहे.

परंतु, श्री. हरेश हिरामण म्हात्रे, श्री. श्रीधर हिरामण म्हात्रे, श्रीमती नंदा महादेव खुटारकर, श्री. लहू गोविंद म्हात्रे, श्री. अंकुश गोविंद म्हात्रे, श्री. भगवान गोविंद म्हात्रे, श्रीमती अपर्णा दिपक कदम, श्री. उमेश माया म्हात्रे, श्री. आशिर्वाद माया म्हात्रे, श्रीमती दुर्गा महादेव म्हात्रे हे अनाधिकाराने सदर मिळकतीबाबत त्रयस्थाशी व्यवहार करण्याच्या प्रयत्नात असल्याचे आमच्या अशिलांच्या निदर्शनास आले आहे. सबब, प्रस्तुतची सावधान नोटीस जाहीर करणे आमच्या अशिलांना भाग पडले आहे.

तरी या सावधान नोटीसीने आमचे अशिल कळवितात की, तरी वर उल्लेखलेल्या जमीन मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा व्यवहार, करार, मदार कोणत्याही व्यक्तीबरोबर करु नये, असा कोणताही व्यवहार करण्यात आल्यास तो सर्वस्वी बेकायदेशिर ठरेल व तो आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच अशा व्यवहाराबाबत आमचे अशिल वरील सर्व जमीन मालक व नविन खरेदीदार / विकासक यांच्या विरुध्द योग्य ती दिवाणी व फौजदारी कारवाई करतील याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २२/०२/२०२३

**सही/-**
**ॲड. संदिप हरिश्चंद्र बटवाल**
बी.कॉम. एल.एल.बी.

पत्ता: १०३, आशादीप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ४१०२०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, माझ्या अशीलांनी खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत, अ) अबुबकर अहमद कुरेशी मयत तर्फे वारस १) मैमुना अबुबकर कुरेशी उर्फ खाटिक २) इमरान अबुबकर कुरेशी ३) जाहिद अबुबकर कुरेशी ४) नजमा अबुबकर कुरेशी उर्फ खाटिक ५) खतिजा अबुबकर कुरेशी ब) अईशा बानो उर्फ ऐशाबीबी अ. करीम मयत तर्फे वारस, १) दिलदार करीम कसाई उर्फ मोहमद हुसेन २) सलमा रजाक जाधव उर्फ सलमा अब्दुल रजाक शेख, क) खातीजाबाई अहमद शेख उर्फ कसाई मयत तर्फे वारस १) आदम अहमद शेख उर्फ कसाई २) हवाबीबी अहमद कसाई उर्फ हनिफाबी उस्मान गली शेख ३) हनिफा अहमद कुरेशी उर्फ कसाई उर्फ शेख उर्फ हवाबी नौशाद कुरेशी ४) गुलाम रसूल शेख मयत तर्फे वारस i) अब्दुल हक शेख ii) मोहम्मद सलीम गुलामरूल शेख iii) रुक्साना नझीर अहमद शेख ५) अब्दुल रजाक शेख मयत तर्फे वारस i) सलमा अब्दुल रजाक शेख ii) ओबेद अब्दुल रजाक शेख iii) नीदा अब्दुल रजाक शेख iv) साकीब अब्दुल रजाक शेख ६) मकबूल जफर शेख मयत तर्फे वारस i) जमिला मकबूल जफर शेख ii) इरफान मकबूल जफर शेख iii) फारूक मकबूल जफर शेख iv) शाहिदा शकील पटेल v) रईसा मकबूल जफर शेख vi) फौजिया मारुफ शेख ड) जैनाबिबी कासम मयत तर्फे वारस मदिना महामूद ताडे इ) सादिका बिबी कासम कसाई मयत तर्फे वारस १) जाईद कासम कसाई २) निसार कासम कसाई ३) मुबारक कासम कसाई मयत तर्फे वारस, i) खातून मुबारक कुरेशी उर्फ कसाई ii) रमझान उर्फ रहमान मुबारक कुरेशी iii) हनिफा मुबारक कुरेशी iv) रशिदा मुबारक कुरेशी v) जेनफ मुबारक कुरेशी vi) सायीस उर्फ साहिरा मुबारक कुरेशी ४) आदम कासम कसाई मयत तर्फे वारस i) बिलकीस आदम कसाई उर्फ कुरेशी ii) आमीन आदम कसाई उर्फ कुरेशी iii) मोहम्मद आदम कसाई उर्फ कुरेशी iv) नईमा आदम कसाई उर्फ कुरेशी उर्फ नयना नितीन मोहिते v) रुक्साना आदम कसाई उर्फ कुरेशी उर्फ रेश्मा चंचल सिंग, यांच्यानावे अधिकार अभिलेखी नमूद असलेल्या भोगवटाधारकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. जिचे सविस्तर वर्णन खालील परिशिष्टामध्ये केलेले असून, यापुढे या जमिनीस संक्षिप्तपणे 'सदरहू मिळकती' असे उल्लेखलीले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-चाणजे,ता.उरण,जि. रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २४२ | २ | ०-०४-८०<br>पो. ख. ०-००-००<br>एकूण ०-०४-८० | १.१२ |
| २४३ | ३ | ०-०४-८०<br>पो. ख. ०-००-००<br>एकूण ०-०४-८० | १.०६ |
| २४३ | ४ | ०-१२-८०<br>पो. ख. ०-०१-००<br>एकूण ०-१३-८० | २.९४ |
| २५० | २ | ०-२८-८०<br>पो. ख. ०-००-८०<br>एकूण ०-२९-६० | ५.६९ |

तरी वरील सदरहू मिळकतीबाबत, अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध व अधिकार, ताबाकब्जा, कुळवहिवाट, इजमेंट, समझोता करार, साठेकरार, विक्री, विनिमय, गहाण, बोजा, दान, पोटगी, वारसाहक्क, ट्रस्ट, न्यास, भाडेपट्टा, सबलीज, अंडरलीज, लियन वगैरे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, खाली सही करणार, खरेदीदारांचे वकील यांच्या खालील पत्त्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह, लेखी हरकती रजिस्टड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे, मुदतीत हरकती प्राप्त न झाल्यास, सदरहू मिळकती निर्वेध व बोजारहित आहे, असे समजून आमचे अशील सदरहू मिळकती संदर्भातील सर्व व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. सदिच्छा दिलीप अस्वले**
२०३, मोहिनील अपार्टमेंट,
नवे पोपुड, म्हातवली, उरण, रायगड
पिन कोड - ४००७०२
मोबाईल नं. ७४०००९७२८६

# नेरळमधील मोबाईलच्या दुकानाचे शटर फोडून १५ लाखांचा माल लंपास

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ जुनी बाजारपेठेतील सॅमसंग मोबाईल वर्ल्ड या मोबाईल दुकानाचे शटर अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीचे सुमारास फोडून पंधरा लाखाचा मुद्देमाल लांबविला आहे. हा चोरटा चोरी करताना सीसीटिव्हीमध्ये कैद झाला आहे. घटना २० फेब्रुवारी रोजी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. आठ दिवसांपूर्वी कर्जत शहरातील एका दुकानातून अशीच चोरीची घटना घडली होती.

२० फेब्रुवारीच्या मध्यरात्रीच्या दोन वाजण्याच्या सुमारास नेरळ जून्या बाजार पेठेतील बोबिलआळी समोरील सॅमसंग मोबाईल वर्ल्ड या मोबाईल शॉपचे शटर अज्ञात चोरट्यांनी फोडून दुकानात प्रवेश केला व दुकानातील विविध कंपनीचे जुने व नविन मोबाईल चोरून नेल्याची घटना घडली आहे. सकाळी १० वाजण्याचे सुमारास सॅमसंग मोबाईल वर्ल्ड या मोबाईल दुकानाचे मालक दुकान उघडण्यासाठी आले असता प्रकार उघड झाला आहे. दुकानमधील गल्ल्यात असलेली ८० हजार रूपये रोकड व दुकानातील विक्रीसाठी तसेच दुरुस्तीसाठी आलेले ओपो, सॅमसंग, ॲपल अशा कंपनीचे मोबाईल असा एकूण पंधरा लाख रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

घटनेची माहिती नेरळ पोलिसाना मिळताच नेरळ पोलीस हे घटनास्थळी हजर होऊन पाहणी व दुकानातील सीसीटिव्ही कॅमेऱ्यातील फुटेज पाहिले असता चोरटा मोबाईल शॉपमधील मोबाईल फोन पिशवीमध्ये भरत असताना दिसून आला आहे. या दुकानाचे जवळपास सोने चांदीची दुकाने तसेच उच्चभ्रू लोकवस्ती असल्याने लोकांमध्ये चोरीमुळे भितीचे वातावरण निमार्ण झाले आहे. नेरळ पोलीस हे सीसीटिव्हीमध्ये कैद झालेल्या चोरट्यांच्या मुसक्या कधी आवळणार? व या चोरीच्या गुन्ह्याची उकल कशा पध्दतीने व कधी करणार? याकडे नेरळकरांचे लक्ष लागले आहे.

## ग्रामपंचायत आकुर्ली
ता. पनवेल, जि. रायगड

जा.क्र.४१५/ग्रा.पं./आस्था २०२३
ग्रामपंचायत आकुर्ली
दिनांक २२/०२/२०२३

### जाहीर निविदा

याव्दारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलाचे ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी नोंद वहीतील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत
( वाचा: मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२ (१)

| अ. क्र. | भाग क्र. | स.न /प्रॉ.नं /फा . प्लॉट/ सदनिका/ गाळ नं | जुने नाव | नविन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/J/ ००१ | किरण अरूण शिंदे | अनिता चौधरी |
| २ | | श्री. राम एनक्लेव्ह आकुर्ली ४१०/००३ | श्रीराम बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स | कविता कांताराम जाधव |
| ३ | | गॅलेक्सी अपारमेंट आकुर्ली २२५/३०२ | अमित अशोक पाटील | यादव शिवधनी<br>ज्ञान्तीदेवी इनरमन यादव |
| ४ | | विघ्नहर्ता सोसायटी आकुर्ली २६९/ B / ००५ | जैसराज यादव<br>हंसराज यादव | सतिश विश्वराथ सुतार |
| ५ | | वरदविनायक प्लाझा आकुर्ली ३२०/ B / १०१ | योगेश दिनानाथ तरे | योगिता कैलास पाटील |
| ६ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७ / H / १००४ | कुंदन भालचंद्र दिघे | ओम प्रकाश<br>कामिनी दुबे |
| ७ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/ G /२६०२ | चंद्राबाल्लभ जगदिश कुनियाल | परेश जनार्दन पाटील |
| ८ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/ H / ५०५ | सुभाष देवाराम चौधरी<br>सुरेखा सुभाष चौधरी | बृजेश कुमार केशव बाबु<br>प्रियंका केसरवानी |
| ९ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/ F / २८०६ | राहुल मुरलीधर मालुंजकर<br>शर्वरी राहुल मालुंजकर | राजेश पांडूरंग चव्हाण<br>स्मिता राजेश च्वहाण |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असुन या बाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसाचे आत ग्रामपंचायत आकुल कार्यालयात लेखी स्वरूपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदत करणेत आलेनंतर प्राप्त होणा-या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुंबई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२(१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल यांची कुपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(जयेंद्र घनशाम म्हात्रे)**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. भारती सचिन पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

## जाहीर नोटीस

माझे अशिल श्री.शशिकांत पांडुरंग बारसिंग वय ५२. व्यवसाय, शेती, रा. : माहुली. ता.खानापुर जि.सांगली यांच्या वतीने सर्व जनतेस सदर नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की खालील वर्णनाच्या जमिनीचे मालक १) श्री.पांडुरंग एकनाथ बारसिंग २) श्री.बाळकृष्ण एकनाथ बारसिंग ३) श्री.रामचंद्र विष्णू बारसिंग (एकुमॅ) ४) श्रीमती हिराबाई केरू बारसिंग व इतर सर्व - सज्ञान, राहणार : मौजे - माहुली, ता.खानापुर (विटा), जि. सांगली. यांच्या संयुक्त मालकीची मौर्जे माहुली, तलाठी सजा माहुली, ता.खानापुर (विटा),जि. सांगली येथे गट क्रमांक व उपविभाग क्र.७३, एकुण क्षेत्र ०-०६-०० इतकी जमीन आहे. सदर जमिनीची कौटुंबिक वाटणी झालेली असून सदर जमिनीपैकी १) श्री. पांडुरंग एकनाथ बारसिंग व २) श्री. बाळकृष्ण एकनाथ बारसिंग यांच्या हिश्श्यास आलेल्या एकूण जमिनीपैकी (क्षेत्र ०-०२-००) इतकी जमीन ते स्वखुशिने **'संमतीपत्राद्वारे'** श्री. शशिकांत पांडुरंग बारसिंग यांना घर बांधणीसाठी दिली आहे. सदर जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे आहेत .

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | गट नं व उपविभाग | ठिकाण | एकूण क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ७३ | मौजे- माहुली, ता. खानापुर (विटा), जि. सांगली | एकूण जमीन क्षेत्र **०-०६-००** पैकी १) श्री. पांडूरंग एकनाथ बारसिंग व २) श्री. बाळकृष्ण एकनाथ बारसिंग यांच्या हिश्श्यास आलेले **०-०२-००** इतके क्षेत्र | ० = ०९ |

**या वर्णनाची जमीन** माझ्या अशिलांना **''संमतीपत्राद्वारे''** घर बांधण्यासाठी देणार आहेत. तरीही याबाबत कोणाही व्यक्ती व्यक्तींचे किंवा आर्थिक संस्थाचे वरील जमिनीसंबंधी कुठल्याही प्रकारचा दावा हरकती जसे विक्री, गहाण, ताबा, जबाबदारी, बक्षिस, भेट, भाडेपट्टा, वारसाहक्क, कर्ज असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत या जमिनीच्या संबंधातील दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रतीसह माझ्या कार्यालयीन पत्त्यावर संपर्क साधावा अन्यथा सदर जमिनीवर माझ्या अशिलांकडुन घर बांधण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती तक्रारींचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दिनांक : २२/०२/२०२३

**सही/-**
**श्री.निरंत वासुदेव पाटील**
( ॲडव्होकेट)

**कार्यालय :** तळमजला. प्लॉट नं.बी ४०,से.२०,अष्टविनायक बिल्डींग, नेरूळगाव. नवी मुंबई.७०६. फो.नं.९३२४५६९८०६.

## ग्रामपंचायत आकुर्ली
ता. पनवेल, जि. रायगड

जा.क्र.४१४/ग्रा.पं./आस्था २०२३
ग्रामपंचायत आकुर्ली
दिनांक २२/०२/२०२३

### जाहीर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांस कळविण्यात येते कि. खालील प्रमाणे कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत तरी अधिकृत ठेकेदारांनी दिनांक २३/०२/२०२३ ते २६/०२/२०२३ रोजी दुपारी ३:०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा त्याच दिवशी शक्य झाल्यास दिनांक २७/१२/२०२३ सकाळी ११:०० वाजता उपडणेत येतील त्यावेळी उपस्थित रहावे. कोणतीही एक अगर सर्वच निविदा मंजुर करणे अगर नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.

**१)**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम १% | निविदा फॉर्म मिळण्याची मुदत | निविदा पाठविणेची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ग्रामपंचायत आकुर्ली हद्दी मध्ये स्ट्रिट लाईट बसविणे. (ग्रामनिधी) | ३७३१६४ | ३७३१ | २३/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |
| २ | सागर पाटील घरापासून ते फ्युचर हिल बिल्डिंग पर्यंत पाईप गटार लाईन टाकणे (ग्रामनिधी) | ९९६१६४ | ९९६१ | २३/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |
| ३ | समाज मंदिर रंगरंगोटी करणे (ग्रामनिधी) | ८५००० | ८५० | २३/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |
| ४ | मेन नाला ते भरत म्हात्रे त पर्यंत पाईप गटार लाईन टाकणे. (ग्रामनिधी) | ३४८२२५ | ३४८२ | २३/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |
| ५ | एम ऐ सी बी ऑफीस ते पनवेल पॅराडाईज च्या पाठीमागे पर्यंत पाईप गटार व सिमेंट कॉंकटी करणे (ग्रामनिधी) | १२१२१९१ | १२१२१ | २३/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |
| ६ | राजेश ठाकुर बिल्डिंग ते चर्च पर्यंत पाईप गटार व सिमेंट कॉंकीटीकरण करणे (ग्रामनिधी) | ११३३३९२ | ११३३३ | २३/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |
| ७ | रा.जि.प. शाळेतील हॉल ला लादी बसविणे. (१५ वा वित्त आयोग सन २०२२/२३) | ७०००० | ७०० | २३/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |
| ८ | रा.जि.प. शाळेतील स्टाफ साठी स्वतंत्र स्वच्छता गृह बांधणे. (१५ वा वित्त आयोग सन २०२१/२२) | ४०००० | ४०० | २३/०२/२०२३ | २६/०२/२०२३ |

**अटी / शर्ती**
१. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल.
२. इसारा रक्कम रोखीत भरावा लागेल.
३. निविदा किंमत नापरतावा समजावी.
४. नियमाप्रमाणे आयकर तसेच इतर कर भरावे लागतील.
५. अधिकृत ठेकेदाराने निविदा न भरल्यासच अनुभवी ठेकेदाराचा विचार केला जाईल.
६. निविदा मंजुर केल्यास रू.५००/- चे स्टँप पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल.
७. ५% सुरक्षा अनामत प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
८. इसारा व सुरक्षा अनामत ९० दिवसानी कामाचा दर्जा पाहुन परत मिळेल.
९. वर्क ऑर्डर प्रमाणे मुदतीत काम पुर्ण न झाल्यास व दुस-या ठेकेदारांकडुन ग्रा. पं ने काम करून घेतल्यास होणा-या खर्चास जबाबदार रहावे लागेल.
१०. वरील अटी मान्य असणारांनीच निविदा भरावी.

**२)**

| अ.क्र | वस्तु / साहित्याचे नाव | लेखाशिर्षक | सन | नग |
|---|---|---|---|---|
| १ | रबर गतिरोधक खरेदी करणे | ग्रामनिधी | २०२२/२०२३ | |
| २ | झेरॉक्स मशिन खरेदी करणे | ग्रामनिधी | २०२२/२०२३ | |

**अटी / शर्ती**
१. सर्वात कमी दराने अथवा कोणतेही दरपत्रक मंजुर अगर नामंजुर करण्याचा आधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. त्याची कारणे दिली जाणार नाही.
२. वस्तुचे दरपत्रक ऑफिस वेळेत येऊन द्यावी.
३. वस्तुचे दर बाजारभावाप्रमाणे असावे व बाजारभावापेक्षा जास्त नसावे.
४. दिलेल्या मुदतीत वस्त ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध न झाल्यास आपला दरपत्रक रद्द करण्यात येईल व केलेली मागणी रद्द समजण्यात येईल.
५. साहित्य व वस्तुचे दर सर्व (व्हॅट टॅक्स इ.) करासहीत पोहोच नमूद करणेचे आहेत. प्राप्त दरापैकी कोणतेही एक दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकरण्याचा अधिकार ठेवला आहे.

**सही/-**
**(जयेंद्र घनशाम म्हात्रे)**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**

**सही/-**
**(सौ. भारती सचिन पाटील)**
**सरपंच**
**ग्रामपंचायत आकुर्ली**
**ता. पनवेल, जि. रायगड**


# ADMISSION
**ACADEMIC YEAR 2023-2024**

**JANARDAN BHAGAT SHIKSHAN PRASARAK SANSTHA'S INSTITUTE OF INDUSTRIAL SAFETY**
(INSTITUTE CODE: 0358)
(Affiliated to Maharashtra State Board of Technical Education Mumbai)

**APPLICATIONS ARE INVITED FOR “ADVANCED DIPLOMA IN INDUSTRIAL SAFETY”**
(DURATION- ONEYEAR COURSE - NUMBER OF SEATS 60)
Admissions are on "First - Come- First Basis"

**ELIGIBILITY–**Any Science Graduate/Graduate in Medical Science/BDS/Graduate in Occupational Therapy (OT), Graduate in Physiotherapy (PT) /Graduate in Veterinary Science or
Degree/Diploma in Engineering/Technology or its equivalent from a recognized Statutory University/ Board or
Advance Diploma in Fire Safety and Industrial Environmental Engineering (FA) / Post Diploma in Fire Engineering (FI) / Diploma in Fire Service Engineering (FR) / Advance Diploma in Fire Safety Engineering (FS) / Advance Diploma in Industrial Safety & Security Management (FF) of MSBTE.

**COMMENCEMENT OF THE COURSE JULY 2023**
Prospectus and Application forms for the above course can be obtained between 11.00 am and 05.00 pm. from Institute office.

C/o, CKT High School & Jr. College, Plot No. 08, Sector - 14, CIDCO Colony, Opp. Railway Station, New Panvel (E) - 410206, Dist. – Raigad.
**9920053204/ 9930651467/ 7208215941**

## निवडक

### निबंध स्पर्धेचे रविवारी वितरण

**चौक :** नेताजी पालकर मंडळातर्फे दिवंगत ज्येष्ठ पत्रकार जनार्दन रामचंद्र भरतुक यांच्या तृतीय स्मृतिदिनानिमित्ताने सिद्धगडचे हुतात्मे भाई कोतवाल व हिराजी पाटील या विषयावर राज्यस्तरीय खुली व शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली. तसेच उंबरखिंड विजय दिन निमित्ताने उंबरखंडीचा संग्राम व विजय या विषयावर कै.भागुबाई गो. सकपाळ स्मृतीशालेय निबंध स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचा बक्षीस समारंभ सरनोबत नेताजी पालकर यांच्या जन्म गावी चौक येथे रविवार २६ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता जवळच हनुमान मंदिरात आयोजित केला आहे. प्रसादिक भजनी मंडळाचे अध्यक्ष, हरी महाराज माळी यांच्या अध्यक्षतेखाली गोविंदराव पिंपळगावकर राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय जिवासेना वसंतराव कोळंबे ज्येष्ठ इतिहास संशोधक, आझाद दस्त्याचे लेखकगिरीश कंठे आदी मान्यवरांच्या उपस्थित आयोजित केला असून सर्व इतिहास प्रेमींनी कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

### कारागृह उपाययोजना बैठक

**अलिबाग :** अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली कारागृह विभागाचे सर्व कारागृह उपमहानिरीक्षक व अधीक्षक यांच्या कारागृह विभागातील अडीअडचणी जाणून घेवून त्या दूर होण्याच्या दृष्टीने करावयाच्या उपायोजनांबाबतची आढावा बैठक पार पडली. महाराष्ट्र राज्यातील कारागृहामध्ये वय वर्षे ५० व त्यापेक्षा जास्त वय असलेले बंदी बंदीस्त असतात. त्यामध्ये काही वयोवृध्द बंदी आजारी असतात, या बाबींचा सारासार विचार करुन वय ५० किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या सर्व न्यायाधीन बंद्यांना साधारणत: जाड बेडींग (अंथरुण) तसेच उशी स्वखर्चाने आणण्याची परवानगी देण्याबाबत उपस्थित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना प्रारुपास मान्यता दिली आहे. त्यानुसार कारागृहातील दाखल वय वर्षे ५० किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या सर्व न्यायाधीन बंद्यांना साधारणत: जाड बेडींग (अंथरुण) तसेच उशी स्वखर्चाने आणणे, यासाठी परवानगीच्या अधिकाराबाबत सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख व कारागृह अधीक्षक यांना परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात आले आहे, असे पुणे कारागृहाचे जनसंपर्क अधिकारी एस. बी. दराडे यांनी कळविले आहे.

### एड्सबाबत जनजागृती कार्यक्रम

**अलिबाग :** एच.आय.व्ही एड्स आणि गुप्तरोग प्रतिबंध उपचार आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष रायगड- अलिबाग, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुहास माने यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि स्वयंसिध्दा सामाजिक विकास संस्था,रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने २३, २४ फेब्रुवारी या कालावधीत एड्सबाबत जनजागृती करण्यात येणार आहे. २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ठीक ८.३० वाजता रोहा बस स्थानक, सकाळ ११ वाजता एल.अँड.टी कॉलनी, नागोठणे व सायंकाळी ४ वाजता सुधागड पाली आणि २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता एस.टी स्टँड, माणगाव व सायंकाळी ४.०० वाजता लोणेरे फाटा येथे कलापथकाच्या सादरीकरणाद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. यावेळी जिल्हा सामान्य रुग्णालय रायगड-अलिबाग, शासकीय रुग्णालयातील आयसीटीसी एकात्मिक समुपदेशन व तपासणी केंद्र येथील सहकारी उपस्थित राहणार असून या कार्यक्रमात नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा रुग्णालयाच्या वतीने जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक संजय माने व स्वयंसिद्धा सामाजिक विकास संस्थेच्या वतीने सुचिता साळवी यांच्याकडून करण्यात आले आहे.

# गणेश विसर्जन घाटावर महामार्गाचा पडणार हातोडा?

## पूल बांधकामामुळे माणगाव नगरपंचायतीचे २५ लाख जाणार पाण्यात

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई - गोवा महामार्गावरील माणगाव काळ नदीवर असणारा ब्रिटीश कालीन पूल हा वाहतुकीसाठी अपुरा पडत असल्याने या पुलालगत दुसरा नवीन पूल शासनाकडून बांधण्याचे काम सुरु झाले आहे. त्यामुळे या पुलाच्या विस्तारीकरणात पुलालगत असणारा माणगावकरांचा गणपती विसर्जनाचा घाट १० सप्टेंबर २०१८ रोजी माणगाव नगरपंचायतीने २४ लाख रुपये खर्चून बांधला होता. महामार्गाच्या या पुलाच्या बांधकामाआड येत असल्याने या गणपती विसर्जन घाटावर महामार्गवाल्यांचा हातोडा पडणार आहे. यामुळे माणगाव नगरपंचायतीचे लाखो रुपये पाण्यात जाणार आहेत. हा गणपती विसर्जन घाट गणेशभक्त व ग्रामस्थांचा गणेश उत्सवात गणपती विसर्जनासाठी मोठा मानला जातो.

मुंबई - गोवा महामार्गावर माणगाव बाजारपेठेत गणेश उत्सव, होळी तसेच सण उत्सव लग्न सराई, सार्वजनिक सुट्ट्यांमध्ये प्रवासी नागरिकांना वाहतूक कोंडीशी सामना करावा लागतो. त्यातच पर्यटकांची वर्दळ यामुळे मुंबई बाजूकडून कोकणात जाणाऱ्या पर्यटक प्रवासी नागरिकांना माणगाव रेल्वे स्थानकापासून बाजारपेठेतून काळ नदीवरील पुलापर्यंत वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागते.



तसेच कोकण व तळ कोकणातून येणाऱ्या वाहनांना काळ नदी पुलापासून ते रेल्वे स्थानकापर्यंत वाहतूक कोंडीत तासनतास अडकून पडावे लागते. यामुळे प्रवाशांचा वेळ, पैसा वाया जातो. तसेच हालही होतात. माणगाव काळ नदीवरील पूल हा ब्रिटीशकालीन शेकडो वर्षापासून बांधलेला असून त्या पुलावर अनेक वेळा छोट्या मोठ्या दुरुत्या झाल्या आहेत. मात्र हा पूल वाहतुकीसाठी अपुरा पडत असल्याने या पुलावर वाहतूककोंडी सतत होते. त्यांमुळे प्रवासी, नागरिक व ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून या पुलालगत नवीन दुसरा पूल बांधण्यात येत आहे.

या नवीन पुलाचे बांधकाम शासनांनी एका ठेकेदारामार्फत सुरु केले असून हा पूल १०५ मीटर लांब व १६ मीटर रुंदीचा असणार आहे. तसेच मुंबई-गोवा महामार्गावरील कळमजे गावचे फाट्यावर गोद नदीवरील ब्रिटीशकालीन पूल हा कमकुवत झाल्याने व पावसाळ्यात या पुलावर पुराचे पाणी वाहते यामुळे हा पूल नव्याने बांधण्याचे काम हाती घेतले आहे. तसेच रत्नागिरी जिल्हाच्या बॉर्डरवर असणारा महत्वाचा पूल असे तीन पुलांच्या बांधकामासाठी २१ कोटी रुपये मंजूर झाले आहेत. माणगाव काळ नदीवरील पुलाचे काम डिसेंबर २०२३ पूर्वी संबंधित ठेकेदारामार्फत पूर्ण करावयाचे आहे. या पुलाचा पाया काळ नदीत खोदकाम करून संबधित ठेकेदाराकडून सुरु करण्यात आला आहे. मात्र या पुलाच्या बांधकामाआड गणपती विसर्जन घाट येत असल्याने तो तुटण्याची शक्यता आहे.

त्यामुळे आगामी गणेश उत्सवात गणेशभक्तांना काळ नदीत गणपती विसर्जन करताना गणपती विसर्जन घाटाची उणीव भासणार आहे. माणगाव नगरपंचायतीला हा गणपती विसर्जन घाट तुटणार की नाही ? याबाबत महामार्ग विभागाने कोणतीही पूर्वसूचना वा लेखी नोटीस दिली नाही. यामुळे सर्वच अनभिज्ञ आहेत.

**माणगाव नगरपंचायतीने नागरिकांच्या मागणीचा विचार करून काळ नदीत गणेश उत्सवात गणपती विसर्जनासाठी येणाऱ्या गणेशभक्तांना महिला व वृद्धांसाठी निवारा व बैठकीसाठी गणपती घाटाची सोय करण्यात आली होती. विसर्जनावेळी गणेशभक्तांना आपल्या लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप देण्यासाठी हा गणपती विसर्जन घाट २०१८ रोजी सुमारे २४ लाख रुपये खर्च करून बांधला होता. हे बांधकाम तुटणार आहे की नाही? याबाबत नगरपंचायतीला संबंधित खात्याने कळविलेले नाही.**

— ज्ञानदेव पवार,
नगराध्यक्ष माणगाव.

**काळ नदीवर नव्याने बांधण्यात येणाऱ्या पुलालगत असणारा माणगाव नगरपंचायतीने बांधलेला गणपती विसर्जन घाट तुटणार की नाही याचे सर्वेक्षण केले जाईल व हा घाट बाधित झाल्यास त्याचे नव्याने मूल्यांकन करून नगरपंचायतीला मोबदला शासनाच्या नियमाप्रमाणे वाटप केला जाईल.**

— श्री. महाडकर,
महामार्ग विभाग महाड

### खोपोली येथील दुचाकी अपघातात तरुणाचा मृत्यू

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई - पुणे जुन्या महामार्गावर खोपोली शहरातील ख्रिश्चन समाज स्मशानभूमी जवळ (बापदेव मंदिर) दरम्यान दुचाकी रोड डिव्हायडर व लाईट पोलला धडकून झालेल्या अपघातात दुचाकी स्वार भूषण आयगल (वय ३७, रा. शास्त्रीनगर, खोपोली) या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला.

अपघातात डोक्याला जबर इजा झाल्याने हा मृत्यू झाला असून खोपोली पोलिसांत या संदर्भात नोंद झाली आहे. बुधवारी पहाटे चार ते साडेचार वाजण्याच्या सुमारास ही अपघाताची घटना घडली आहे. खोपोली पोलीस याबाबत अधिक तपास करीत असून शासकीय प्रक्रिया पार पडल्यावर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

# उणेगाव मुंबई बस सुरु झाल्याने प्रवाशांनी फोडले फटाके

## परिसरातील अनेक गावातील ग्रामस्थांच्या मागणीला यश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील महत्वाच्या गोरेगाव-उणेगाव या मार्गावरील अनेक गावातील ग्रामस्थांनी माणगाव बस आगार प्रमुख चेतन देवधर यांचेकडे गोरेगाव उणेगाव मार्गे मुंबई बस सुरु करावी अशी मागणी केली होती. या भागातील अनेक ग्रामस्थ व तरुण वर्ग विविध कामानिमित्त मुंबई येथे स्थायिक झाला आहे. त्यांचे सततचे येणे जाणे गावाकडे शेतीवाडी व नातेवाईक असल्यामुळे चालू असते.

या मार्गावर बस नव्हे तर अन्य वाहने नसल्यामुळे प्रवाशांची मोठी कुचंबणा होत होती. या मागणीचा विचार करीत बस आगार प्रमुख यांनी गोरेगाव -उणेगाव मार्गे मुंबई तसेच परतीची मुंबई उणेगाव गोरेगाव



हि बस सुरु केल्यामुळे असंख्य प्रवाशांचा प्रश्न सुटला आसल्यामुळे ग्रामस्थांनी गावातच आनंदाचे फटाके फोडले आहेत.

गोरेगाव - उणेगाव- मुंबई ही बस १६ फेब्रुवारीपासून माणगाव बस आगाराने या भागातील ग्रामस्थांच्या मागणीचा विचार करून सुरु केली आहे. या मार्गावर इतर कोणतीही प्रवासाची व वाहनांची सोय नसल्याने नगरिकांना प्रायव्हेट वाहनांना भाडे देवून माणगाव किंवा गोरेगाव येथे जावे लागत होते.

यात पैसा व वेळ जास्त ग्रामस्थांचा जात होता. शिवाय बॅगा व साहित्य ने-आण करताना नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. या मार्गावर गोरेगाव, वडगाव कोंड, वडगाव, उणेगाव, वावे, लोणशी, ढालघर तसेच वाड्या व आदीवासी वाड्या जोडल्या गेल्या असून या पंचक्रोशीतील गावांना लाभ मिळणार आहे. त्यांमुळे ग्रामस्थांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे.

माणगाव बस आगार प्रमुख चेतन देवधर याचे या भागातील ग्रामस्थ व प्रवाशांनी आभार मानले आहेत.

# धनगर समाज कल्याणकारी संस्थेचा मेळावा उत्साहात



**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

स्वप्ननगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबईत वास्तव्यात असणाऱ्या धनगर समाजातील महिलांना एकत्रित आणून त्यांचा आनंद द्विगुणित करण्याचा उदात्त दृष्टिकोन डोळ्यांसमोर ठेवत रायगड धनगर समाज कल्याणकारी संस्था मुंबई यांच्या वतीने महिलांसाठी हळदीकुंकू व विद्यार्थ्यांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम तसेच कौटुंबिक मेळावा रविवारी मुंबई येथील चिकित्सक समूह पोदार हायस्कूल गिरगाव येथे पार पडला.

सोहळ्याचे उद्घाघाटन कल्याणकारी धनगर समाज रोहा, तळा, मुरुड तळाचे अध्यक्ष धाऊ ढेबे यांच्या हस्ते करण्यात आले. तर या सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी शिवसेना विभाग प्रमुख दिपक नाईक, व्ही. पी. रोड पोलीस स्टेशनचे पी. एस. आय राहुल पाटील, पनवेल येथील मंडळ अधिकारी मंगेश ढेबे, क. ध. स रोहा, तळा, मुरुड संस्थेचे उपाध्यक्ष रविंद्र झोरे, सचिव केशव हिरवे, सह-सचिव चंद्रकांत शिंगाडे , माजी अध्यक्ष. सुभाष होगाडे ,रायगड धनगर समाज सेवा संघाचे अध्यक्ष गणेश शिंदे , माजी सचिव महेंद्र महाबले, चिटणीस मनोहर ढेबे आणि त्यांचे सहकारी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते सत्कारमूर्ती रायगड पोलीस वामन गोरे आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पॉवर लिफ्टींग स्पर्धांमध्ये अनेक ठिकाणी किताब जिंकणारे वेट लिफ्टर बबन झोरे यांचा संस्थेच्या वतीने शाल, श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी सगी झोरे, उषा ढेबे, गौरी कोकळे,जयश्री वरक,हिरा झोरे,गुलाब लांबोरे, सुचिता लांबोरे यांनी योगदान दिले.

सोहळा पार पाडण्यासाठी सस्थेचे अध्यक्ष जनार्दन ढेबे, उपाध्यक्ष - महेश लांबोरे, सह- सचिव गणेश गोरे, खजिनदार नामदेव झोरे, सह-खजिनदार हरीचंद्र लांबोरे, सल्लागार धर्मेश वरक, चंद्रकांत शेळके, प्रकाश ढेबे, नरेश झोरे,गंगाराम ढेबे, संघटक -तुकाराम शिंगाडे, सदस्य प्रभाकर होगाडे, संदीप झोरे,संजय ढेबे विकास लांबोरे, पांडुरंग बा. ढेबे,संदिप वरक, कैलास ढेबे, मा.महेंद्र झोरे, पांडुरंग धों. ढेबे,यशवंत होगाडे, भास्कर कोकळे ,जानू होगाडे, दीपक शिंगाडे ,प्रभाकर झोरे, महेंद्र होगाडे उपस्थित सर्व समाज बांधव, महिला भगिनी व विद्यार्थि, विद्यार्थीनी या सर्वांनी मोलाचे सहकार्य केले.

सूत्रसंचालन संस्थेचे सल्लागार वसंत शिंगाडे यांनी केले.

### ▮ यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव

*यावेळी समाजात कला, क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक परिवर्तन घडावे म्हणून विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात इयत्ता १ते ४ या वयोगटामधून प्रथम गणेश लांबोरे,द्वितीय श्रावणी वरक, तृतीय साहिल वरक, तर इयत्ता ५ ते ८ वी च्या वयोगटात प्रथम प्राची ढेबे, द्वितीय समर झोरे, तृतीय प्रणाली ढेबे हिने पटकाविला. इ ९ वी ते ओपन गटामध्ये प्रथम डी. एस.के ग्रुप, द्वितीय आर्या होगाडे, तृतीय येण्याचा मान पायल ढेबे हिने मिळविला. या सर्व विजयी स्पर्धकांना संस्थेच्या वतीने ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले.*

# इंदापूर रेल्वेस्थानकाची प्रवासी संख्या रोडावली

## एकाच गाडीला थांबा ; स्थानक बनले क्रॉसिंग स्टेशन

**माणगाव : प्रतिनिधी**

गतिमान प्रवासासाठी कोकण रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करण्यात आले. त्यामुळे आतापर्यंत कोकण रेल्वे एकेरी ट्रॅक वरून दुपदरीकरणामुळे कोकण रेल्वेचा प्रवास अधिक गतिमान झाला. गोवा, साऊथ, मुंबई, कोकण प्रवास करणाऱ्या पर्यटक प्रवाशांसाठी कोकण रेल्वेने मोठी भरारी घेतली आहे. सन २०१७ मध्ये माजी केंद्रीय मंत्री सुरेश प्रभू यांनी इंदापूर येथे कोकण रेल्वे क्रॉसिंग स्टेशनचे भूमिपूजन केले होते. त्यावेळी त्यांनी या मार्गावरील देशातील रेल्वे मार्ग गतिमान करण्याबरोबरच कोकण रेल्वे मार्गही प्राधान्याने गतिमान करीत या मार्गांनी ज्यादा रेल्वे गाड्या सोडण्याबरोबरच अतिजलद गाड्याही या मार्गाने धावतील. त्यामुळे कोकणातील पर्यटनाला अधिक चालना मिळेल. या मार्गावरील अतिजलद गाडया सुरू करण्याच्या दृष्टीने कोकण रेल्वेचे अधुनिकिरण करण्याची गरज आहे. असे सांगितले होते. त्यानंतर इंदापूरसह अनेक रेल्वे स्टेशनचे आधुनिकीकरण केले. मात्र इंदापूर येथे रेल्वे स्टेशनकडे जाताना रेल्वे ट्रॅक ओलांडून प्रवाशांना जीव मुठीत धरून जावे लागते. तसेच



या स्टेशनवर पूर्वी अनेक गाड्यांना थांबा होता. आता या आधुनिकीकरणात एकच रेल्वे गाडी थांबत आहे. त्यामुळे हे स्टेशन फक्त क्रॉसिंग स्टेशन बनले आहे. त्यामुळे कोकण रेल्वेचा प्रवास प्रवाशांना दुर्मिळ झाला असून प्रवाशांनी इंदापूर रेल्वे स्टेशनकडे पाठ फिरवली असून या अत्याधुनिकीकरणात रेल्वे प्रशासनाने आपले प्रवासीच हरवले आहेत.

**प्रवास जीवघेणा ठरण्याची भीती**

इंदापूर रेल्वे स्टेशनवरील इमारत ठिकाणी जाण्यास रेल्वे रूळ ओलांडावा लागतो कारण तिकीट काढण्यासाठी जिन्याची सोय नाही तसेच मालगाडी उभी असल्यास प्रवाशांना ५०० मीटर मागून अथवा पुढून तिकीट काढण्यासाठी जावे लागते. त्याचबरोबर कांही वेळेस स्टेशनवर अठवडाभर मालगाडी उभी असते. तेव्हा प्रवाशांची अधिकच गैरसोय होते त्याचबरोबर फ्लॅटफॉर्मची कमी उंची असल्यामुळे वयोवृद्ध इसम तसेच लहान बालके व महिला यांना चढ उतार करताना तारेवरची कसरत करावी लागते. २७ नोव्हेंबर १९९३ पासून कोकण रेल्वेवर अवलंबून असणाऱ्या तळा तालुक्यातील दुर्गम भागातील प्रवाशांना खर्चिक भुर्दंड मोजावा लागत असून माणगाव ते तळा ४५ रु. बसचा भुर्दंड सोसावा लागतो. तर मिनीडोरने ६० रु खर्च सोसावा लागतो. तळा - इंदापूर रेल्वे स्टेशनवर गाडीच्या वेळेत बसची सुविधा उपलब्ध करावी असे तळा तालुक्यातील जनतेची मागणी आहे. त्यामुळे कोकण रेल्वेच्या अत्याधुनिकीकरणाचा फटका प्रवाशांना बसत आहे.

दिवा-सावंतवाडी-मडगाव व मडगाव-सावंतवाडी-दिवा कोकण रेल्वे १ नोव्हेंबर २०२१ पासून बंद आहे तर इंदापूर रेल्वे स्थानकात सकाळी १०.०० रत्नागिरी-दिवा गाडी थांबते. तर दिवा - रत्नागिरी जाणारी रल्वे सायंकाळी ६.०० वाजता रेल्वे स्थानकावर थांबते. मात्र या व्यतिरिक्त एकही रेल्वे गाडीला थांबा नाही. त्यामुळे हे रेल्वे स्थानक क्रॉसिंग पुरतेच मर्यादित राहिले आहे. हे रेल्वे स्टेशन सुसज्ज केले असून रेल्वे स्थानकालगत कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान आहे. इंदापूर शहर व बाजरपेठेच्या विरुद्ध दिशेला रेल्वे स्थानक उभारल्यामुळे प्रवाशांना रेल्वे ट्रॅक क्रॉसिंग करून जावे लागते. त्यामुळे हा प्रवास जीवघेणा ठरत आहे. या विविध समस्यांमुळे इंदापूर रेल्वे स्थानक नावापुरतेच उरले असून रेल्वे प्रशासनाने याकडे दुर्लक्ष चालवले आहे.

# कांगारूंचा संघ होतोय कमकुवत

## ऑस्ट्रेलियाचा चौथा खेळाडूही मायदेशी



**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि ऑस्ट्रेलिया याच्यातील चार कसोटी सामन्यांच्या मालिकेत भारताने पहिले दोन कसोटी सामने जिंकून २-० अशी आघाडी घेतली. भारताविरूद्धच्या कसोटी मालिकेत पहिल्या दोन्ही कसोटीत नांग्या टाकल्यानंतर कांगारू संघाचे एका पाठोपाठ एक दिग्गज खेळाडू संघ सोडून मायदेशी जात आहेत. आता ऑस्ट्रेलियाचा चौथा खेळाडू भारत सोडून घरी गेला आहे.

वेस्टर्न ऑस्ट्रेलियाकडून देशांतर्गत क्रिकेट खेळण्यासाठी अ‍ॅश्टन अगर भारत दौर्‍यावरून मायदेशी परतत आहे. इंदूरमध्ये १ मार्चपासून सुरू होणार्‍या तिसर्‍या बॉर्डर-गावसकर कसोटीपूर्वी अगरच्या जागी ऑस्ट्रेलियाच्या कसोटी संघात कोणाचाही समावेश करण्यात आलेला नाही. याआधी संघाचा नियमित कर्णधार पॅट कमिन्स मायदेशी परतला. जोश हेझलवूड आणि डेव्हिड वॉर्नर दुखापतीमुळे आधीच मायदेशी परतले आहेत. अगर पूर्णपणे तंदुरुस्त आहे, पण २ मार्चला पुढील शेफील्ड शिल्ड सामना आणि ८ मार्चला ५० षटकांच्या मार्श कप फायनलमध्ये खेळण्यासाठी तो मायदेशी गेला आहे.

मिशेल स्वेपसन आपल्या पहिल्या मुलाच्या जन्मासाठी ऑस्ट्रेलियाला गेला होता. पॅट कमिन्सही कौटुंबिक कारणांमुळे ऑस्ट्रेलियात गेला, मात्र तोही तिसर्‍या कसोटीपूर्वी भारतात परतण्याची शक्यता आहे. तिसर्या कसोटीसाठी कॅमेरून ग्रीन तंदुरुस्त होण्याची खात्री असल्याने ऑस्ट्रेलियाने वॉर्नरच्या जागी अन्य फलंदाजाचा समावेश केलेला नाही.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध अगरने शेवटची कसोटी सिडनी येथे खेळली होती. नॅथन लियॉनसह दुसरा फिरकीपटू म्हणून तो संघाचा भाग होता, मात्र त्याला भारतात एकही सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. त्याच्या जागी ऑस्ट्रेलियाने ऑफस्पिनर टॉड मर्फी आणि कुहनेमन यांना पदार्पण केले. ऑस्ट्रेलियन संघ नागपुरात दोन आणि दिल्लीत तीन फिरकी गोलंदाजांसह खेळला, पण अगर या दोन्ही सामन्यात संघाबाहेर राहिला.




## रामशेठ ठाकूर स्कूलच्या विद्यार्थिनीचे इंडोरन्स व स्केटिंग स्पर्धेत यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

याक स्कूल खोपोली येथे पार पडलेल्या इंडोरन्स स्केटिंग स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी लावण्या पांडे हिने सहभाग घेऊन दोन कांस्यपदक पटकाविली. तिची इंटरनॅशनल स्पर्धेकरिता निवड करण्यात आली.

तिने सोमय्या युनिव्हर्सिटी येथे झालेल्या स्पीड स्केटिंग स्पर्धेत दोन कास्य पदक पटकाविली, तसेच तिने राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत सहभाग घेतला होता. या विद्यार्थिनीचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले व तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत भुजबळ भगिनींना सुवर्ण पदक

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंड येथील केंट शहरात झालेल्या इंटरनॅशनल फिल्ड असोसिएशनद्वारे आयोजित



वर्ल्ड इनडोअर आर्चरी चॅम्पियनशिप या आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत देविशा व तनिष्का पंकज भुजबळ यांनी सुवर्ण कामगिरी करीत भारताला सुवर्ण पदक मिळवून दिले आहे.

देविशा व तनिष्का या दोघीही भुजबळ नॉलेज सिटी एमईटी मुंबई या विद्यालयाच्या विद्यार्थीनी आहेत. इंग्लडच्या मेडवे पार्क स्पोर्ट्स सेंटर, गिलिंगहॅम, केंट येथे १३ ते १८ फेब्रुवारीमध्ये आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय धनुर्विद्या स्पर्धेत ३८ देशातील ५६८ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत भारताचे १२ स्पर्धक विविध वयोगटात आणि वेगवेगळ्या धनुष्य प्रकारात सहभागी झाले होते. या स्पर्धेत देविशा पंकज भुजबळ हिने १९ वर्षांखालील कम्पाऊंड बो गटात सुवर्णपदक आणि तनिष्का पंकज भुजबळ हिने १७ वर्षांखालील कम्पाऊंड बो गटात एक सुवर्णपदक मिळवून आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. भारतीय संघ हा फिल्ड आर्चरी असोसिएशन ऑफ इंडियाच्या बॅनरखाली खेळला होता.

## विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रातही नाव कमवावे : प्राचार्य जैन

**नागोठणे : प्रतिनिधी**

जीवनात यश मिळविण्यासाठी अभ्यास हा महत्त्वाचा आहेच, पण त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रातसुद्धा नाव कमवावे, शरीर निरोगी असेल तरच अभ्यास चांगला होतो व शरीर निरोगी राहण्यासाठी दिनचर्येत थोडा वेळ तरी एखादा मैदानी खेळ खेळण्यासाठी विद्यार्थ्यांनी द्यायलाच हवा, असे प्रतिपादन शेठ श्री ओटरमल शेशमल परमार पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य पी. पी. जैन यांनी केले.

पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये सध्या क्षितीज महोत्सवांतर्गत विविध क्रीडा स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. त्याच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. भारती एज्युकेशन सोसायटीचे सीईओ कार्तिक जैन हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व खेळाचे महत्त्व पटवून दिले.



फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य आशिष पगारिया, डी. फार्मसी विद्यालयाचे प्राचार्य समीर पवार, परमार हायस्कूलचे मुख्याध्यापक भूषण टक्के, डमिन डीन प्रा. नांदगावकर, पत्रकारिता क्षेत्रातील शामकांत नेरपगार, महेश पवार, राज वैशंपायन, मंजुळा म्हात्रे यांच्यासह वरिष्ठ पोलीस भास्कर शिंद, सर्व एचओडी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

## अजित चंदिलावरील आजीवन बंदी उठवली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

२०१३मध्ये स्टॉप फिक्सिंगपेकरणी राजस्थान रॉयल्स संघाचे तीन खेळाडू अजित चंदिला, एस. श्रीसंत आणि अंकित चव्हाण यांच्यावर बीसीसीआयने आजीवन बंदी घातली होती. यातील श्रीसंत आणि अंकित चव्हाणवरची बंदी बीसीसीआयने आधीच उठवली होती. आता अजित चंदिलावरील आजीवन बंदीदेखील उठवली.

याबाबत सरन यांनी सांगितले की, बीसीसीआयने अजित चंदिलावर २०१३मध्ये सर्व क्रिकेट स्पर्धांमधून निलंबित केले होते. त्यानंतर अजितने अपील केली होती की, त्याला श्रीसंत आणि अंकित चव्हणसारखी समान वागणूक मिळावी. त्याची अपील मान्य केली जात आहे.

## वानखेडे स्टेडियमवर धोनी की पाठशाला

### अंडर-१९ महिला क्रिकेट संघाला दिल्या टिप्स



**मुंबई : प्रतिनिधी**

कॅप्टन कूल या नावाने जगात आपला ठसा उमटवणारा महेंद्रसिंग धोनी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. १९ वर्षांखालील महिला क्रिकेटपटूंना क्रिकेटच्या टिप्स देऊन धोनी या वेळी पुन्हा एकदा चर्चेत आला आहे.

मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर विश्वचषक जिंकणाऱ्या १९ वर्षांखालील भारतीय महिला संघासोबत महेंद्रसिंग धोनीचा संवादात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ज्याचे नाव क्रिकेट क्लिनिक : एमएसडी असे दिले गेले. या कार्यशाळेत क्रिकेटचा प्रचंड अनुभव असलेल्या महेंद्रसिंग धोनीने अंडर-१९ महिला खेळाडूंना फिटनेस, गेम प्लॅन तयार करणे, दबावाखाली चांगले खेळणे यासह अनेक महत्त्वाच्या टिप्स दिल्या.

१९ वर्षांखालील महिला खेळाडूंना संबोधित करताना धोनीने अशा कार्यशाळांचे स्वागत केले. त्याचबरोबर सांगितले की, भारत नेहमीच क्रिकेटचे पॉवरहाऊस राहिला आहे. सध्या टीम इंडियाचा महिला संघ एक नवा आयाम देत आहे. तो म्हणाला की, भारताच्या महिला क्रिकेटपटूंमध्ये या खेळाबाबत नेहमीच भरपूर वाव आहे. यावर माझा नेहमीच विश्वास आहे आणि आता जेव्हा तो अशा कार्यशाळांमध्ये तरुण खेळाडूंशी संवाद साधतो, तेव्हा त्यांचा विश्वास अधिकच दृढ होत आहे.

## दीपक चहरचे सीएसकेमध्ये पुनरागमन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीग २०२३चा हंगाम ३१ मार्चपासून सुरू होणार आहे. यापूर्वी मध्यमगती गोलंदाज दीपक चहरला पूर्णपणे तंदुरुस्त घोषित करण्यात आले आहे. गेल्या ६ महिन्यांपासून दीपक चहर दोनदा त्याच्या फिटनेसच्या समस्येशी लढताना दिसला होता, पण आता तो आगामी आयपीएल हंगामासाठी पूर्णपणे तंदुरुस्त असल्याचे घोषित करण्यात आले आहे.

दीपक चहर पूर्वी स्ट्रेस फ्रॅक्चरच्या समस्येशी झुंज देत होता, त्यानंतर त्याला क्वाड ग्रेड तीन टियरचा सामना करावा लागला. दीपकने शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना गेल्या वर्षी बांगलादेश दौर्‍यावर खेळलेल्या एकदिवसीय मालिकेदरम्यान खेळला होता.

## विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत रुद्रांक्षला पुन्हा सुवर्ण

**कैरो : वृत्तसंस्था**

भारतीय नेमबाज रुद्रांक्ष पाटीलने कामगिरीत सातत्य राखताना मंगळवारी विश्वचषक स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारातील वैयक्तिक गटात सुवर्णपदक पटकावले. या पदकासह भारताचे स्पर्धेतील वर्चस्वही कायम राहिले. भारताची आतापर्यंत तीन सुवर्णपदकांसह एकूण चार पदके झाली आहेत.



सोमवारी आर. नर्मदा नितीनच्या साथीने मिश्र दुहेरीत सुवर्णपदक जिंकल्यानंतर रुद्रांक्षने मंगळवारी वैयक्तिक गटात आपल्या अव्वल मानांकनास साजेशी कामगिरी करताना पुन्हा सोनेरी यश संपादन केले. सुवर्णपदकाच्या लढतीत त्याने जर्मनीच्या मॅक्सिमिलियन उल्ब्रिचचा १६-८ असा पराभव केला. मानांकन फेरीतही रुद्रांक्षने २६२ गुणांचा वेध घेत अव्वल क्रमांकासह अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवली होती. उल्ब्रिचचे २६०.६ गुण होते. त्यापूर्वी पात्रता फेरीत ६२९.३ गुण मिळवत रुद्रांक्ष सातव्या क्रमांकाने मानांकन फेरीसाठी पात्र ठरला होता.

सुवर्णपदकाच्या लढतीत पहिल्या सात फैर्‍यानंतर रुद्रांक्ष आणि उल्ब्रिचमध्ये ७-७ अशी बरोबरी होती, मात्र पुढील तीनही फैर्‍यांमध्ये रुद्रांक्षने सरशी साधताना १३-७ अशी आघाडी मिळवली. अखेरीस रुद्रांक्षने लढतीत १६-८ असा विजय मिळवत सुवर्णपदक आपल्या नावे केले. भारताचे दिव्यांश सिंह पन्वर आणि हृदय हजारिका हे अन्य दोन नेमबाज पात्रता सिद्ध करू शकले नाहीत.

भारतीय नेमबाजांनी सोमवारी एअर रायफल आणि पिस्तुल प्रकारात आपले निर्विवाद वर्चस्व राखले होते. यामध्ये नर्मदा-रुद्रांक्ष जोडीने १० मीटर एअर रायफल मिश्र दुहेरीत सुवर्णपदक पटकावले होते. वरुण तोमरने पहिल्या दिवशी कांस्यपदक जिंकले होते. त्यानंतर वरुणने रिदम संगवानच्या साथीने १० मीटर पिस्तूल प्रकारातील मिश्र दुहेरीत सुवर्ण यश मिळवले.

## माहीम ज्युवेनाइल महिला क्रिकेट स्पर्धेत राजावाडी क्लब विजयी

**ठाणे : प्रतिनिधी**

माहीम ज्युवेनाइल स्पोर्ट्स क्लब व शिवाजी पार्क जिमखान्याचे माजी क्रिकेटपटू प्रकाश पुराणिक यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित स्पर्धेत राजावाडी क्रिकेट क्लबने अंतिम फेरीत स्पोर्ट्स फील्ड सी. सी. संघावर नऊ गडी राखून विजय मिळवला.

शनिवारी शिवाजी पार्क जिमखान्यावर खेळल्या गेलेल्या अंतिम फेरीतील सामन्यात स्पोर्ट्सफील्ड संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली, परंतु राजावाडी क्रिकेट क्लबच्या गोलंदाजांच्या अचूक माऱ्यासमोर त्यांना २० षटकांत चार गडी गमावून केवळ १०६ धावा जमवता आल्या.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com